१८-०९-२०१६ महासभा

१८-९-२०१६ महासभा

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा<br>दि. १८/१/२०१६ रोजी<br>वे. १०:३० वाजता<br>प्र.क्र. १२० ते १५० |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | C |
| | १५/१६ |

## अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १५/०१/२०१६.

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

**पुरक घोषणा**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १८/०१/२०१६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १५८ | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ११/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------<br>"ईश्वर, अल्ला तेरे नाम, सबको सनमती दे भगवान", "अहिंसा परमोधर्म" अशी प्रेम, एकता, अखंडता, समानता, विश्वबंधूता, व सर्वधर्म समभावाची शिकवण संपूर्ण जगाला देणारे शांतीदुत "राष्ट्रपिता महात्मा गांधी" यांचा पुतळा मिरा भाईंदर मनपा कार्यालय, भाईंदर (प.) येथील प्रांगणात बसविणेबाबत. |
| १५९ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक १०/०१/२०१६ (प्राप्त दि. ११/०१/२०१६) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------<br>मालमत्ता कर विभागातील गैर प्रकाराबाबत. |
| १६० | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक १०/०१/२०१६ (प्राप्त दि. ११/०१/२०१६) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------<br>महानगरपालिकेचे मिरारोड येथील स्व. इंदिरा गांधी रुग्णालयातील गैरसोय बाबत. |
| १६१ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक १०/०१/२०१६ (प्राप्त दि. ११/०१/२०१६) रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------<br>केंद्र सरकारच्या हागणदारीमुक्त शहर योजने अंतर्गत घरातील शौचालय बाबत. |
| १६२ | सन्मा. सदस्य श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी यांचा दिनांक १३/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>---------------<br>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महिला आणि पुरुषांकरीता अद्यायवत सार्वजनिक शौचालय उभारण्याबाबत. |

(हरेश ल. पाटील)
**महापालिका नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मनपा/नगरसचिव/मुख्यो/ ६४/१/१५-१६,
दि. ११/१/२०१६


# डॉ. आसिफ शेख

M.Com., B.Ed. (Mum.), Ph. D.(U.K.)

सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

नगरसेवक व मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका


जावक क्र. ________ प्रकरण क्र. १५८ करिता दिनांक ११/०१/२०१६.

प्रति,

मा.नगरसचिव,

मिरा भाईंदर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दि. १८/०१/२०१६ रोजी आयोजित केलेल्या मा.महासभे करीता प्रस्ताव.

**विषय :- "ईश्वर, अल्लाह तेरे नाम, सबको सनमती दे भगवान", 'अहिंसा परमोधर्म' अशी प्रेम, एकता, अखंडता, समानता, विश्वबंधूता व सर्वधर्म समभावाची शिकवण संपूर्ण जगाला देणारे शांतीदूत 'राष्ट्रपिता महात्मा गांधीजी' यांचा पुतळा मिरा भाईंदर मनपा कार्यालय, भाईंदर (प.) येथील प्रांगणात बसविणे बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या भाईंदर (प.) येथील मुख्य कार्यालयाच्या प्रांगणात छत्रपति श्री. शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धपुतळा यापूर्वीच बसविण्यांत आलेला आहे.

सदर पुतळ्यांच्या शेजारी राष्ट्रपिता आदरणीय श्री. महात्मा मोहनदास करमचंद गांधी (महात्मा गांधीजी) यांचा अर्धकृती भव्यदिव्य पुतळा बसविण्यांत यावा असा प्रस्ताव मी देत आहे.

तरी कृपया सदर विषय मा.महासभेत सर्वानुमते मंजुर करणेसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी, ही विनंती.

(डॉ.आसिफ शेख)


संपर्क कार्यालय : सी/3, अशोक नगर, दत्त मंदिर जवळ, भाईंदर (प.) - 401101 ✆:022-2818 0244 भ्रमणध्वनि : 09004111777 / 09820720767

Email : draasifshaikh@yahoo.com ★ Website : www.draasifshaikh.in

প্রকাশকাল [illegible]
মূল্য ২৭.৫০ টা.
৭৭/৭/৭৫

मनपा/सचिव/पु.दो/२५/२/७५-१६
दि. १४/०७/२०१६

**धृवकिशोर पाटील**
**नगरसेवक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

जा.क्र/मनपा/०७/१६८/२०१६-१७ दि.१०/०७/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये**
**दि.१८/०७/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. १५८-करिता**

प्रति.,
मा. नगर सचीव सो.,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

विषय – मालमत्ता कर विभागातील गैर प्रकारा बाबत.

महोदय,

मिरा-भाईंदर मनपाच्या मालमत्ता कर विभागा मार्फत अनेक झोपड्यांचे व घराचे मुळ मालकाचा नांवावर कर पावत्या न येता भलत्याच नांवावर कर पावत्या काढण्यात आल्या आहेत, ज्यामुळे या पावत्या दाखवुन इतर दस्तावेज उदा. आधार कार्ड, पॅन कार्ड, शिधापत्रिका इ. शासकीय योजनांचा लाभ घेण्याचे काम चालेले आहे अश्या अनेक तक्रारी पालीकेत आल्या आहेत.

तसेच कर व संगणक विभागाचे आपापसात तालमेळ नसल्यामुळे असंख्य चुका मालमत्ता कराच्या देयकात आहेत. नागरीकांनी व नगरसेवकांनी तक्रार केल्या नंतर वारंवार खेपा मारुन सुध्दा दुरुस्ती होत नाही करदाते पैसे भरण्यास तयार आहेत पण बिलांच्या चुकी मुळे ते शक्य होत नाही, मालमत्ता कराच्या देयकाचे पैसे भरताना ५०० व १००० च्या नोटांवर पेन्सील ने आपला मालमत्ता क्र. लिहावा लागतो पैसे दोन तीन वेळा लिपीक मोजतो त्यामुळे भरपूर रांग लागते व अश्या अनेक अडचणीना करदात्या नागरीकांना तोंड दयावे लागते, होणा-या गैर प्रकार टाळण्यासाठी चौकशी अधिकारी नेमावा व गैर प्रकार करणा-या अधिका-यांना निलंबीत करावे तसेच मालमत्ता कर भरण्याकरीता चेक ड्रॉप बॉक्स आपले प्रभाग व मुख्य कार्यालयात ठेवावा, पैसे मोजण्याकरीता मशीन ठेवावे असा प्रस्ताव मी मांडत आहे.

आपला नम्र,

धृवकिशोर पाटील

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
: 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

প্রাপ্তি. ২২/১/১৫
কার্য. ৪.১০
২২/১/১৫

मनपा सचिव/पुढोरो/१०२/२०१५-१६
दि. १९/०१/२०१६

**ध्रुवकिशोर पाटील**
माजी. सभागृह नेता
मिरा भाईंदर महानगरपालिका
सदस्य - दक्षता समिती शिधावाटप कार्यालय, भाईंदर

जा.क्र/मनपा/०१/१७२/२०१६-१७ दि.१०/०१/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१८/०१/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत महासभा प्रकरण क्र. १६०. करिता**

प्रति.,
**मा. नगर सचीव सो.,**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय – महानगरपालीकाचे मिरारोड येथील स्व. इंदिरा गांधी रुगणालयतील गैरसोय बाबत.**

महोदय,

मनपाचे स्व. इंदिरा गांधी रुगणालयात रुग्णाचे खुपच हाल होत आहे. पालिकेच्या वरीष्ठ अधिका-यांचे अजीबात लक्ष नाही पालीकेचे लाखो रुपये वाया जात आहेत अनागोंदी कारभाराने डॉक्टर्स चे फावले आहे व डॉक्टरांना रुगणांकडुन व मनपाकडुन पैसे लुटत आहे.

सदर रुगणालयात स्त्रीरोग तज्ञ, बाळरोग तज्ञ व भूल तज्ञ डॉक्टर्स आहेत. पण त्यांची वेळ ९ ते ४ असताना फक्त हजेरी लावतात १ ते २ तास बसतात नंतर निघून जातात व आपली खाजगी प्रॅक्टीस करतात. पालीके तर्फे त्यांना Non Practice Allowance मिळतो पण तरीही ते बाहेर प्रॅक्टीस करतात त्यांना बाहेर प्रॅक्टीस करायचे बंधन आहे व त्याचे त्यांना पैसे मिळतात.

मनपाची सोनोग्राफी मशीन असतानाही येणा-या रुगणाना कमीशनच्या हव्यासपोटी सोनोग्राफी करण्याकरीता जैनम सेंटर शांती नगर या एकच सेंटर वर सोनोग्राफी करण्याकरीता पाठवीले जाते. Medical Representative यांना मनपाच्या रुगणाल्यात येणेकरीता मनाई आहे पण ते येतात आपल्या प्रॉडक्ट्स ची सेटींग करतात समोरच्या मेडीकल मध्ये माल ठेवतात त्याच वस्तु व औषध आणण्याकरीता डॉ. रुगणांच्या नातेवाईकांना पाठवतात.

संपर्क कार्यालय - ६ पदमावती, नारायणनगर, भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१.
Mobile : 98202 96597, Tel.: 2819 8989 E-mail : dhruvkishor.patil@gmail.com Website : dhruvkishor.com

ध्रुवकिशोर पाटील
माजी. सभागृह नेता
मिरा भाईंदर महानगरपालिका
सदस्य - दक्षता समिती शिधावाटप कार्यालय, भाईंदर



बाळंतपणा करीता येणा-या रुग्णांना व नातेवाईकांना डॉक्टर्स घाबरवतात स्वातःचे काम कमी करण्याकरीता त्यांना नायर किंवा डॉ. आंबेडकर हास्पीटल (कांदिवली) येथे जाणेस सांगीतले जाते. N.I.C.U चे ३ बेड व वेंटीलेटर असताना त्यांचा उपयोग करत नाही व रुगणांना डॉक्टर च्या मर्जीतल्या खाजगी रुगणालयात जावयास सांगतात.

उपरोक्त डॉक्टर्सच्या व्यतीरिक्त ३ मानधना वर डॉक्टर ची नियुक्ती केली आहे. वास्तवीक उपरोक्त डॉक्टर असताना यांची गरज नाही तरी सुध्दा हे डॉक्टर नेमलेले आहे. व एक नोरमल बाळपणाचे ५००रु व सिजरीन केल्यानंतर २०००रु असे त्यांना मानधन दिले जाते कधी-कधी हे डॉक्टार नसतात तर कधी-कधी यांना जाणुन बुजुन बोलवले जाते व त्यांचे महीन्याला १ ते १.५ लाखचे मानधान दिले जाते.

औषध खरेदी करताना नामांकीत कंपनी कडुन खरेदी न करता सुमार दर्जाच्या कंपनी कडुन औषध मागवीली जातात .

साफसफाई करीता ३० ठेक्याचे कर्मचारी नेमले असताना फक्त १० ते १३ कर्मचा-याकडुन काम करुन घेतले जाते व ३० कर्मचा-यांचे पगार काढले जातात.

या सारखे अनेक गैर प्रकार असुन आपण त्वरीत चौकशी करुन संबंधीत दोषी कर्मचा-यांवर कार्यवाही करावी असा प्रस्ताव मी मांडत आहे.

आपला नम्र,

ध्रुवकिशोर पाटील

संपर्क कार्यालय - ६ पदमावती , नारायणनगर , भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१.
Mobile : 98202 96597, Tel.: 2819 8989 E-mail : dhruvkishor.patil@gmail.com Website : dhruvkishor.com

પ્રાપ્તિ. ૨૧/૧૨/૧૬
સ્ટાંપ: K.૧૦
૧૨/૧/૧૬

मनपा/सचिव/पु.क्रो/४७/८/२०१५-१६
दि. ११/०१/२०१६

**ध्रुवकिशोर पाटील**
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

जा.क्र/मनपा/०१/१७१/२०१६-१७ दि.१०/०१/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१८/०१/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत ,**
**महासभा प्रकरण क्र.** १६१ करिता

प्रति.,
**मा. नगर सचीव सो.,**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय – केंद्र सरकारच्या हागणदारीमुक्त शहर योजनेअंतर्गत घरातील शौचालय बाबत.**

महोदय,

केंद्रसरकारच्या हागणदारी मुक्त शहर योजनेअंतर्गत घरात शौचालय बांधल्यानंतर लाभार्थ्यांना २२ हजार रुपये अनुदान दिले जाते. अनुदान देताना मनपाच्या अधिकारी व करमचा-यांने वस्तुस्थिती पहावी व नंतरच अनुदान मंजुर करावे असा नियम असताना वस्तुस्थिती न पाहता घरात शौचालय असतानाही लाभार्थ्यांना अनुदान दिले आहे. अश्या तक्रारी मनपात आल्या आहेत. सदर बाब गंभीर असून वाटप झालेल्या संपूर्ण लाभार्थ्यांची व अनुदानाची चौकशी करावी व झालेले नुकसान संबंधीत कर्मचारी व अधिका-यांकडुन वसुल करुन कायदेशीर कार्यवाही करावी असा प्रस्ताव मी मांडत आहे.

आपला नम्र,

ध्रुवकिशोर पाटील

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्ह्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
☎ : 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

प्राप्त दि. ११/७/१६
वेळ. सायं. ५.१०
[illegible signature]
१२/७/१६

# प्रशांत ज्ञानदेव दळवी
**नगरसेवक**
सदस्य : वृक्ष प्राधिकरण समिती
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.) - महाराष्ट्र शासन

मनपा/सचिव/पु.धो/२८/५ - २०१५-१६
दि. १३/०१/१६
मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : सी / १४-१०१, आदर्श को. ऑप. हौ. सो. लि., शांतीनगर, सेक्टर नं. ४, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.
दूरध्वनी : २८१२८७७७ भ्रमणध्वनी : ९८६७७०८७७७ Email : prashantdalvi@gmail.com

जावक क्र. सेना/९९९/१६ दिनांक : १२/०१/२०१६

१८-०१-२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणे बाबत.

प्रकरण क्र.१६२ करीता

प्रति,
मा. नगरसचिव साहेब,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

विषय : मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महिला आणि पुरूषांकरीता अद्यायवत सार्वजनिक शौचालय उभारण्याबाबतचा "ज" चा प्रस्ताव.

महोदय,

मिरा-भाईंदर माहनगरपालिका क्षेत्रातील वाढती लोकसंख्या पाहता या शहरात अद्यायवत सार्वजनिक शौचालयांची संख्या अगदी नगण्य आहे. मिरारोड रेल्वे स्टेशन नजीक असलेले सार्वजनिक शौचालय वाहतूकीला अडथळा होत असल्याच्या नावाखाली काढून टाकण्यात आलेले आहे. त्यामुळे प्रवासी वर्गाची अवस्था बिकट झालेली आहे. मिरारोड क्षेत्रात अद्यायवत सार्वजनिक शौचालयाची संख्या वाढविण्याची नितांत गरज आहे. प्रत्येक प्रभागात किमान दोन या प्रमाणे महिला आणि पुरुषांकरीता अद्यायवत सार्वजनिक शौचालयाची उभारणी करणे नितांत गरजेचे आहे.

त्याचप्रमाणे चेणा ते उत्तन या क्षत्रात देखील याच धर्तीवर अद्यायवत सार्वजनिक शौचालय उभारण्यात यावेत तसेच राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक झोपडपट्टीवासीयांकरीता त्यांच्या कडील उपलब्ध जागेनुसार प्रत्येक झोपडपट्टीवासीयांना स्वतंत्र शौचालय बांधुन देण्याची कार्यवाही तत्पर करण्यात यावी व या विषयांची तातडीने अंमलबजावणी करणेकरीता चर्चेकरीता हा विषय मा. महासभेत घेण्यात यावा ही विनंती.

सुचक : प्रशांत ज्ञानदेव दळवी

अनुमोदक : हरीश्चंद्र रा. आमगावकर

[illegible] [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible] [illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/२४७/२०१५-१६ दिनांक :- ११/०१/२०१६.

## // परिपत्रक //

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती ____________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा शुक्रवार दि. ०४/१२/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत पुरक घोषणा क्र. ११७ ते १२८ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **सोमवार, दिनांक १८/०१/२०१६ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ २६० /२०१५-१६ दिनांक :- २८/०७/२०१६.

## // परिपत्रक //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ----------------------------

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा सोमवार दि. १८/०१/२०१६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. १३५ व १४२ ते १५७ तसेच पुरक घोषणा क्र. १५८ ते १६२ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **शनिवार, दिनांक ३०/०१/२०१६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/२६० /२०१५-१६ दिनांक :-२७/०९ /२०१६.

## // परिपत्रक //

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती** ______________________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा सोमवार दि. १८/०९/२०१६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. १३५ व १४२ ते १५७ तसेच पुरक घोषणा क्र. १५८ ते १६२ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **शनिवार, दिनांक ३०/०९/२०१६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# <u>मिरा भाईंदर महानगरपालिका</u>

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०७/०१/२०१६.

## <u>मा. महासभा</u>

**मा. महासभा सूचना क्र. :- ०९, दिनांक ०७/०१/२०१६**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. १८/०१/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०९, दि. ०७/०१/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

ध मिरा भाईंदर महानगरपालिका

# मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०९, दि. ०७/०१/२०१६ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. १८/०१/२०१६**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १२९ | दि. १३/०७/२०१५ व दि. २२/०७/२०१५ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| १३० | मतदार याद्यांतील नावे वगळणेबाबत.<br>संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडील क्रमांक/सामान्य/का-१/टे-३/कावि, दिनांक :- ०५/१२/२०१५ रोजीचे पत्र. |
| १३१ | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत. |
| १३२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत. |
| १३३ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर दिल्ली दरबार नाल्यावर सर्व्हीस रस्ता रुंदीकरणासाठी कल्वर्ट बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १३४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थांनी डक्ट / केबलसाठी आकारण्यात येणाऱ्या दरात वाढ करणे व आवश्यक इतर कामासाठी दर आकारणेबाबत. |
| १३५ | महानगरपालिका आकृतीबंधास व सुधारीत सेवा प्रवेश नियमांना मंजुरी मिळणेबाबत. (मा. महासभा दि. ०४/१२/२०१५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ११२) |
| १३६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत. |
| १३७ | महापौर चषक २०१६ आयोजित करणेसाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| १३८ | विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३९ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| १४० | कनकिया हॉस्पीटल आरक्षण क्र. ३०२ राज्य सरकारकडे चालविणेबाबत प्रस्ताव देणे. |
| १४१ | भाईंदर (पूर्व) चौपाटी सुंदरीकरण, नविणीकरण करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. |
| १४२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० नुसार मा. महासभा दि. ०१/०७/२०१५, ठराव क्र. १२ अन्वये गठीत करण्यात आलेल्या विशेष समित्यांवर सदस्यांची नेमणुक करणेबाबत. |
| १४३ | महानगरपालिकेची विविध विकास कामे चालु आहेत त्या कामांत फेरबदल करणे / सुधारणा करणेसहित कामांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. |
| १४४ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत संगणकीय सेवा उपलब्ध करणेबाबत आर्थिक प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| १४५ | भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केटची पुर्नःबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| १४६ | मिरारोड (पूर्व) कनकिया परिसरात जेट्टी, विसर्जन धक्का बांधणे व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १४७ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर सम्राट हॉटेल समोर रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पुल बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १४८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विवीध विभागाचे अभिलेख स्कॅनींग व डिजीटायजेशन करणे कामी ई निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १४९ | केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण / चालविणेबाबत. |

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| १५० | मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस व अस्तित्वातील बसेस चालविणेसाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत. |
| १५१ | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणेबाबत.<br>संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक :- १९/११/२०१५. |
| १५२ | अंध व अपंग योजने अंतर्गत "अंध व अपंग व्यक्तीसाठी वैद्यकिय उपचाराकरीता आर्थिक मदत" |
| १५३ | बालवाडी शिक्षिकांच्या मानधनात वाढ करणेबाबत. |
| १५४ | भाईंदर (प.) विनायकनगर येथे समाजमंदिराची पुर्नबांधणी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १५५ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर विवीध विभागात कार्यरत असलेल्या ०७ कनिष्ठ अभियंता यांच्या सेवेच्या कालवधीस मदतवाढ देण्याबाबत. |
| १५६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्वच्छतागृहाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती संचलन करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| १५७ | महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या पाण्याचा उपसा थांबविणे व शहरा बाहेरुन येणारा मातीभराव नियंत्रण ठेवणेसाठी उपाययोजना करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

(हरेश ल. पाटील)
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ०७ जानेवारी २०१६**

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०९, दि. ०७/०१/२०१६ सोबतची विषय पत्रिका**
**सभा सोमवार दि. १८/०१/२०१६**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| १२९ | दि. १३/०७/२०१५ व दि. २२/०७/२०१५ रोजीच्या मा. विशेष महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| १३० | मतदार याद्यांतील नावे वगळणेबाबत.<br>संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडील क्रमांक/सामान्य/का-१/टे-३/कावि, दिनांक :- ०५/१२/२०१५ रोजीचे पत्र. |
| १३१ | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत. |
| १३२ | मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारित करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याबाबत. |
| १३३ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर दिल्ली दरबार नाल्यावर सर्व्हीस रस्ता रुंदीकरणासाठी कल्वर्ट बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. |
| १३४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थांनी डक्ट / केबलसाठी आकारण्यात येणाऱ्या दरात वाढ करणे व आवश्यक इतर कामासाठी दर आकारणेबाबत. |
| १३५ | महानगरपालिका आकृतीबंधास व सुधारीत सेवा प्रवेश नियमांना मंजुरी मिळणेबाबत. (मा. महासभा दि. ०४/१२/२०१५ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. ११२) |
| १३६ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत. |
| १३७ | महापौर चषक २०१६ आयोजित करणेसाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत. |
| १३८ | विविध विकास कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणे. (पाणी पुरवठा विभाग) |
| १३९ | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेस मान्यता मिळणेबाबत. |
| १४० | कनकिया हॉस्पीटल आरक्षण क्र. ३०२ राज्य सरकारकडे चालविणेबाबत प्रस्ताव देणे. |
| १४१ | भाईंदर (पूर्व) चौपाटी सुंदरीकरण, नविणीकरण करणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. |
| १४२ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३० नुसार मा. महासभा दि. ०१/०७/२०१५, ठराव क्र. १२ अन्वये गठीत करण्यात आलेल्या विशेष समित्यांवर सदस्यांची नेमणुक करणेबाबत. |
| १४३ | महानगरपालिकेची विविध विकास कामे चालु आहेत त्या कामांत फेरबदल करणे / सुधारणा करणेसहित कामांना आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे. |
| १४४ | महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत संगणकीय सेवा उपलब्ध करणेबाबत आर्थिक प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत. |
| १४५ | भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केटची पुर्नःबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत. |
| १४६ | मिरारोड (पूर्व) कनकिया परिसरात जेट्टी, विसर्जन धक्का बांधणे व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १४७ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर सम्राट हॉटेल समोर रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पुल बांधणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १४८ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विवीध विभागाचे अभिलेख स्कॅनींग व डिजीटायजेशन करणे कामी ई निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| १४९ | केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण / चालविणेबाबत. |

| प्र.क्र. | विषय |
| --- | --- |
| १५० | स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेणेबाबत.<br>संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन परिपत्रक क्रमांक/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक :- १९/११/२०१५. |
| १५१ | अंध व अपंग योजने अंतर्गत "अंध व अपंग व्यक्तीसाठी वैद्यकिय उपचाराकरीता आर्थिक मदत" |
| १५२ | बालवाडी शिक्षिकांच्या मानधनात वाढ करणेबाबत. |
| १५३ | भाईंदर (प.) विनायकनगर येथे समाजमंदिराची पुर्नबांधणी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| १५४ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर विवीध विभागात कार्यरत असलेल्या ०७ कनिष्ठ अभियंता यांच्या सेवेच्या कालवधीस मदतवाढ देण्याबाबत. |
| १५५ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्वच्छतागृहाची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती संचलन करणेबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे. |
| १५६ | महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या पाण्याचा उपसा थांबविणे व शहरा बाहेरुन येणारा मातीभराव नियंत्रण ठेवणेसाठी उपाययोजना करणेबाबत. |
| -- | <u>शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे</u> – |
| --- | <u>समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल</u> – निरंक |

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ०७ जानेवारी २०१६**

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. १८/०१/२०१६ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **३१ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. २९/१०/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष झालेली आहे अश्या कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याचा मा. महासभेत ठराव पारीत झालेला आहे काय? |
| अ) या ठरावांची तारीख, तसेच ठराव मंजूर झाला असल्यास सदर ठरावाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे? |
| ब) आतापर्यंत सफाई कामगारांकरीता किती घरे बांधण्यात आली व कोणत्या ठिकाणी? |
| क) मनपा मध्ये २५ वर्ष सेवा झाली आहे असे किती सफाई कामगार आहेत? त्यांचे नाव व पत्ते द्यावेत? |
| ड) आतापर्यंत किती कामगारांना घरे देण्यात आली? |
| इ) मा. महासभेत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेचे ठराव सहमत झाले आहे का? |
| ई) सुवर्णजयंती नगरोत्थान म्हणजे काय या अंतर्गत काय सुविधा देण्यात आलेल्या आहेत याची संपूर्ण माहिती द्यावी? |
| **३२ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बी.एस.यू.पी. योजना अंमलबजावणी करण्याकरीता २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक करणेकामी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. प्रस्ताव पाठविण्याची तारीख काय? |
| अ) सदर प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली? |
| ब) वाढीव चटई क्षेत्राबाबत शासनाने पाठवलेली उत्तरांची माहिती देणे? |
| क) वाढीव क्षेत्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यास बी.एस.यू.पी. योजना अंतर्गत चालू असलेल्या कामांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे का? |
| **३३ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शांतता क्षेत्राचे लावलेल्या फलकाची साईज किती चौरस मीटर आहे? |
| अ) एकूण लावलेल्या प्रत्येकी साईजप्रमाणे किंमत किती? |
| ब) एकूण किती खर्च आलेला आहे? |
| क) शांतता क्षेत्र लावलेल्या फलकाच्या ठिकाणी योग्यतेने पालन होते का आणि सदरची जबाबदारी कोणाची? |
| ड) आतापर्यंत शांतता क्षेत्राचे उल्लंघन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आली? नाव व त्यांची एकूण दंडात्मक कारवाई केली त्याची माहिती? |
| **३४ डॉ. नयना मनोज वसाणी मा. सदस्या यांनी दि. १३/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) राशनिंग कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणे तसेच सदर ठिकाणी पाणी मीटर कार्यशाळेचेही बांधकाम करुन घेणे असा ठराव पारित झाला होता का? |
| अ) सदर ठरावाच्या अनुषंगाने राशनिंग कार्यलय उभारण्यात येऊन भाड्याने देण्यात आले आहे. तरी पाणी मीटर कार्यशाळेचे बांधकाम का झाले नाही? |
| ब) बांधकाम झाल्यास त्या ठिकाणी पाणी मीटर तपासणी कार्यालयाचे विधिवत काम का सुरु झाले नाही? |
| क) या विषयावर संबंधित अधिकाऱ्याने काय कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा? |
| **३५ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. १६/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी प्लास्टीक पिशव्या जप्त करणेबाबत महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी.आर. कॉपी देणे. |
| अ) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्ती करणेबाबत देण्यात आलेल्या आदेश प्रती. |
| ब) महानगरपालिका क्षेत्रात आजपर्यंत ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या एकूण किती जप्त केल्या आहेत? |
| क) महापालिकेने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्त केलेल्या दंडाची माहिती देणे. |

| |
|---|
| **३६ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २५/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. महासभा दि. १६/०५/२०१३ मध्ये घेतलेला माझ्या प्रश्ना (रिलायन्स) संबंधीत जे काही आश्वासन मला देण्यात आले होते त्याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली आहे? |
| अ) मा. महासभा दि. ०५/०६/२०१३ मध्ये घेतलेला माझा प्रश्न ओ.एल.टी. बाबत दिलेल्या आश्वासनबाबत आजपर्यंत काय कारवाई केली आहे? |
| ब) प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी नियमानुसार बनविण्यासाठी आतापर्यंत काय केले आहे. याबाबतची माहिती त्वरीत देण्यात यावी. प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय कायदा आहे? |
| **३७ श्रीम. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील आर.जी. च्या जागांबाबत खालील प्रश्न चर्चेसाठी सादर करण्यांत येत आहेत. |
| १) आर.जी.च्या कोणकोणत्या जागा महापालिकेतील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने हस्तांतरीत झालेल्या आहेत? जर असेल तर त्या कोणत्या? कोणत्या आर.जी. जागेवर महापालिकेमार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. |
| अ) आर.जी. मध्ये फेरबदल करण्यांत येऊ शकतो का? तसेच या अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/३१४९/२००७-०८,दि.१२/१२/२००७ व पत्र क्र. एस.एस.बी.-२००७/३१३, दि. १८/१२/२००७ या पत्रांचा खुलासा देण्यात यावा. |
| ब) फेरबदल करण्यांत आला असेल तर तो कोणत्या नियमाने करण्यांत आला? |
| क) विकासकर्ताने मंजुर नकाशाचे उल्लंघन केले असेल तर अशा विकासकर्तावर आपण कोणती कार्यवाही करतो? |
| ड) मिरा भाईंदर महानगरपरलिका आरक्षित जागेच्या मंजूर नकरशाच्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्याच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना आपण त्याच्या दुसऱ्या प्लॅनला मंजूरी देऊ शकतो का? |
| इ) आर.जी. आरक्षित जागेवर प्लॅन व्यतिरिक्त काम मंजूर करु शकतो का? मंजूर केलयास कोणतया अधिनियमाने करु शकतो? ह्याचा खुलासा करावा. |
| ई) मी दिलेल्या दि. १०/०५/२०१३ च्या पत्रान्वये मिरारोड (पूर्व) मधील कोणत्या आरक्षित आर.जी. जागा व मोकळी जागा (ओपन स्पेस) कोठे कोठे वापरण्यात आलेल्या आहेत त्याचा सविस्तर खुलासा करावा. |
| **३८ श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ प्रकरण क्र. ७४, ठराव क्र. ७१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे या बहुमताने मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेने सदर विषयाबाबत काय कारवाई केलेली आहे? |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## नगरसचिव विभाग

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र.१३०:-** **<u>मतदार याद्यांतील नावे वगळणेबाबत.</u>**
**संदर्भ :- मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणुक अधिकारी, ठाणे यांचे कार्यालयाकडील क्रमांक/सामान्य/का-१/टे-३/कावि, दिनांक :- ०५/१२/२०१५ रोजीचे पत्र.**

मा. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, ठाणे यांनी वगळणी करण्यात आलेली मतदार यादी सर्वसाधारण बैठकीत पटलावर आणून सदर यादी सन्मा. महापालिका सदस्यांच्या निदर्शनास आणून दिलेबाबतचा ठराव करणेबाबतच्या सुचना दिलेल्या आहेत.

त्या अनुषंगाने १४५ मिरा भाईंदर व १४६ ओवळा माजिवडा विधानसभा मतदार संघातील वगळणी करण्यात आलेली मतदार यादी मिरा भाईंदर महानगरपालिका, नगरसचिव कार्यालय, तिसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे सन्मा. महापालिका सदस्यांना पडताळणीसाठी उपलब्ध करण्यात आलेली आहे.

तरी वगळणी करण्यात आलेली मतदार यादी सर्वसाधारण बैठकीत पटलावर आणून सदर यादी सन्मा. महापालिका सदस्यांच्या निदर्शनास आणून दिलेबाबतचा ठराव पारित करणेसाठी शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१ /२०१६

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. १३१ भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत...

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार भाईंदर (प.) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने तातडीने कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विविध संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) पदावर भरती करणेकरीता दि. ०८/१२/२०१५ रोजी दै. लोकसत्ता, दै. लोकमत, दै. दि फ्री प्रेस जनरल व दै. महाराष्ट्र जनमुद्रा वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्धी केलेली होती.

त्यानुसार पात्र उमेदवारांची दि. २३/१२/२०१५ रोजी थेट मुलाखत घेऊन गुणानुक्रमे उमेदवारांची निवड केलेली आहे. सदर निवड केलेल्या उमेदवारांची निवड व प्रतिक्षा यादी त्याच दिवशी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. या निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | डॉ. निखाते शरद शामराव | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १. | डॉ. अमोल सुरेश पाटील | वैद्यकीय अधिकारी (शस्त्रक्रिया) | - |
| | | निवड यादी | |
| १. | डॉ. सोमाणी मिथुन प्रकाशचंद्र | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १. | डॉ. मानसी अर्पित देऊळकर | वैद्यकीय अधिकारी (बालरोग तज्ञ) | - |
| | | निवड यादी | |
| १. | डॉ. आनंदकुमार मंगलदास पंचाल | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |
| | | प्रतिक्षा यादी | |
| १. | डॉ. अमित साहेबराव वाघ | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| २. | डॉ. राहूल भास्करराव पाटील | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| ३. | डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| ४. | डॉ. जितेंद्र नंदकिशोर इरकल | अस्थिव्यंग शल्य चिकित्सक | - |
| | | निवड यादी | |
| १. | डॉ. चैताली विजय धुरी | मनोविकृती चिकित्सक (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.६६००) | खुला |

| | | | |
|---|---|---|---|
| निवड यादी | | | |
| १. | डॉ. रिया उज्वल राठोड | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. स्नेहल चंद्रकांत नरवाडे | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३. | डॉ. अमोल भिमराव दवणे | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | अ.जा. |
| ४ | डॉ. सचिन दत्तात्रय जगताप | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इमाव |
| ५. | डॉ. प्रशांत युवराज सोनार | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इमाव |
| प्रतिक्षा यादी | | | |
| १. | डॉ. इशा अकबर शिकलगार | वैद्यकीय अधिकारी | खुला |
| २. | डॉ. अमर विलास पाटील | वैद्यकीय अधिकारी | खुला |
| ३. | डॉ. शंतनु सुरेश शुक्ल | वैद्यकीय अधिकारी | खुला |
| ४. | डॉ. सुशांत बबन बगाडे | वैद्यकीय अधिकारी | अ.जा. |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत."

त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस मान्यता मिळणेस विनंती आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि.०१ /०१/२०१६ वेळ ५..१०

आ. ~~स्थायी~~ समिती / [illegible] विभाग

नोंद रजिस्टर अ. क्र. ५४

१/१/१६

नगरसचिव विभाग.

77 Maha 15

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि.१८/०३/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (१३२) - मिरा भाईंदर महानगरपालिकेची विकास योजना सुधारीत करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ अन्वये नगररचना अधिकारीची नियुक्ती करण्याबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राची विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३८ नुसार सुधारीत करण्याबाबत मा. महासभा ठराव क्र. ७६, दि.१५/१०/२०१५ अन्वये मंजूरी दिलेली असून कलम २३(१) नुसार तसा इरादा जाहिर केल्यासंबंधी स्थानिक वृत्तपत्रात व शासन राजपत्रात सुचना प्रसिध्द केलेली आहे.

नियोजन प्राधिकरण म्हणून मिरा भाईंदर महानगरपालिकेने सुधारीत विकास योजना तयार करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २४ प्रमाणे "नगररचना अधिकारी" ची नेमणूक करण्याचा ठराव करणे आवश्यक आहे. सबब शासनाकडून प्रतिनियुक्तीवर असलेले मिरा भाईंदर महानगरपालिकेचे विद्यमान नगररचनाकार यांना राज्य शासनाच्या पुर्वमंजूरीने "नगररचना अधिकारी" म्हणून निमणूक करण्यास मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा गोषवारा
प्राप्त दि. 11/12/2015
3:07 वाजता

गोषवारा प्राप्त दि09/12/2015 वेळ 03:07 वा
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 45
(अधीक्षक)
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १३३ )** :- राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर दिल्ली दरबार नाल्यावर सर्व्हीस रस्ता रुंदीकरणासाठी कल्वर्ट बांधणे कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वरील दहिसर चेक नाका ते काशिमीरा नाल्यापर्यंत रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुक होत असून सदर रस्त्यावरील दोन्ही बाजुतील सर्व्हीस रस्त्याचे रुंदीकरण करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत हाती घेण्यात आलेले आहे. सदर कामांतर्गत दिल्ली दरबार येथील नाल्यावर कल्वर्ट बांधुन रस्ता रुंद करावयाचा आहे. त्यासाठी रु.१,३२,६३,०००/- रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदर कामाच्या खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/15-16/DK/MG-13

11.15

गोषवारा प्राप्त दि. ०७/०७/२०१६ वेळ ११.१५

~~स्था. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ०६

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

(1)

## मा. महासभा दि. १८/०७ /२०१६

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ९३४ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थाना डक्ट/ केबलसाठी आकारण्यात येणाऱ्या रस्ता फोड फी दर सुधारीत करणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक रस्ते विविध सेवा वाहीन्या टाकण्यासाठी सेवा संस्था मार्फत खोदण्यात येतात. त्यासाठी महानगरपालिकेमार्फत ठरलेले दर आकारुन परवानग्या देण्यात येतात व सदर रस्ते महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यात येतात सद्यस्थितीत आकारण्यात येणाऱ्या दरात वाढ करण्याची आवश्यकता असुन ठाणे महानगरपालिकेच्या धर्तीवर इतर अत्यावश्यक कामे व दंड रक्कम आकारण्याचा प्रस्ताव खालील प्रमाणे सादर करण्यात येत आहे.

| अ.क्र | रस्त्याचा प्रकार/ पुर्नपृष्ठीकरण पृष्ठभाग | प्रस्तावित दर |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १. | रस्त्याखालुन भुयारी मार्गाने ड्रिलींग करणे | रु. २०००/-प्रति रनिंग मिटर |
| २. | ग्राऊंटीग केलेला रस्ता | रु. ३९००/-प्रति चौ.मी |
| ३. | कच्चा रस्ता | रु. २०९०/-प्रति चौ.मी |
| ४. | डब्ल्यु बी.एम.रस्ता | रु. ३३००/-प्रति चौ.मी |
| ५. | कॉंक्रीट रस्ता | रु. ११७००/-प्रति चौ.मी |
| ६. | डांबरी रस्ता | रु. ९६००/-प्रति चौ.मी |
| ७. | कॉक्रीट पदपथ | रु. ५५००/-प्रति चौ.मी |
| ८. | फ्लायओव्हर | रु. १३००००/-प्रति चौ.मी /प्रति १ मी रुंदीकरीता |
| ९. | सब-वे | रु. ७८००००/-प्रति चौ.मी /प्रति १ मी रुंदीकरीता |
| १०. | कल्व्हर्ट | रु. ५७२००/-प्रति चौ.मी /प्रति १ मी रुंदीकरीता |
| ११. | पदपथ<br>१) पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग (पुर्नपृष्ठीकरण पेव्हर ब्लॉक)<br>२) पेव्हर ब्लॉक वगळता इतर पृष्ठभाग (पुर्नपृष्ठीकरण लॅक कॉटेड पेव्हर ब्लॉक)<br>३) पेव्हर ब्लॉक<br>४) लॅकर कॉटेड पेव्हर ब्लॉक (पुर्नपृष्ठीकरण लॅकर कॉटेड पेव्हर ब्लॉक) | सर्व पदपथासाठी रु. ५५००/- प्रति चौ.मी |

२

| | | |
|---|---|---|
| . | रस्ता<br>१) मास्टीक अस्फाल्ट<br>२) डांबरी ६०/७० ग्रेड<br>३) डांबरी ३०/४० ग्रेड<br>४) पेव्हर ब्लॉक ८०मी.मी<br>५) पेव्हर ब्लॉक १००मी.मी | रु.७९००/- प्रति चौ.मी<br>रु.९६००/-प्रति चौ.मी<br>रु.९६००/-प्रति चौ.मी<br>रु.५५००/-प्रति चौ.मी<br>रु.५५००/-प्रति चौ.मी |
| १३. | केबल अंथरण्यासाठी अस्तीत्वातील डक्ट वापरणे | रु. ३०००/- प्रति मी/ प्रति केबल |
| १४. | जास्त क्षेत्रफळाच्या डक्ट केबलसाठीचे दर | ६ इंच (१८२.३२ चौ.सेमी) साठी वरील प्रमाणे प्रमाणीत दर त्यापुढील क्षेत्रफळासाठी रस्ता खोदाईमध्ये प्रो रेटा प्रमाणे येणारे अतिरीक्त रस्ता खोदाई आकारणी |
| १५. | एच.डी.डी /ओपन कट मधील चेंबर्स | वरील अ क्र २ ते १२ प्रत्यक्ष मोजमापाप्रमाणे अधिक ५०% |
| १६. | शिवाजी महाराज मार्ग | रु.१०,३३०/- |
| १७. | रस्त्याची खोलीचे खोदाईचे दर | १) १ मी किंवा त्यापेक्षा कमी खोली खोदाईसाठी – १मी खोली खोदाईप्रमाणे असणारे वरीलप्रमाणे प्रमाणीत दर<br>२) १ मी पेक्षा जास्त खोली खोदाईसाठी वरील १ मी प्रमाणे प्रमाणीत दर अधिक वाढीव खोलीसाठी प्रो रेटा प्रमाणे वाढीव दर |
| १८. | रस्त्याच्या रुंदीकरीता दर | १) १ मी किंवा त्या प्रेक्ष कमी रुंदीसाठीचे खोदाईसाठी १ मी रुंदी प्रमाणे असणारे वरील प्रमाणे प्रमाणीत दर<br>२) १ मी पेक्षा जास्त रुंदी खोदाईसाठी वरील १ मी प्रमाणे प्रमाणीत दर अधि वाढीव रुंदीसाठी प्रो रेटा प्रमाणे येणारे वाढीव दर |
| १९. | दोषदायित्व कालावधीमध्ये आकारावयाचे दर, | १) दोषदायित्व कालावधीचे १ ले वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक १०० % जास्त<br>२) दोषदायित्व कालावधीचे २ रे वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक ५०% जास्त<br>३) दोषदायित्व कालावधीचे ३ रे वर्ष वरील दराप्रमाणे येणारी रक्कम अधिक २५% जास्त |
| २०. | दंडात्मक आकारणी<br>१) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला नाही / परंतु विना परवानगी रस्ते खोदाई केली नाही. (बदल नाही)<br>२) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला आहे. / परवानगी पत्र दिले नाही / परंतु विना परवानगी रस्ते खोदाई केली आहे (बदल नाही)<br>३) पुर्नपृष्ठीकरण फी चा भरणा केला आहे. / परवानगी पत्र दिले आहे. / परंतु विहीत मुदतीत काम पुर्न केले नाही. | <br>१) पुर्नपृष्ठीकरण फी अधिक पुर्नपृष्ठीकरण फी च्या ५०% दंडात्मक रक्कम<br>२) पुर्नपृष्ठीकरण फी च्या २५% दंडात्मक रक्कम<br>३) मुदत संपल्यानंतर रु. १३००/- प्रति दिन |

(३)

| | | |
|---|---|---|
| | ४) डक्ट केबल टाकण्याचे काम झाले आहे. परंतु अतिरीक्त माती उचलण्यात आलेली नाही<br>५) रस्ता खोदाई परवानगी मधील अटी व शर्ती नियमांचे पालन न केल्यास<br>६) दंडात्मक रक्कम न भरल्यास | ४) प्रति ट्रक / डंपर फेऱ्यास रु.२६००/- प्रमाणे दंड आकारणी<br>५) सुरक्षा अनामत रक्कमेपासुन वसुल करण्यात येईल<br>६) सुरक्षा अनामत रक्कमेपासुन वसुल करण्यात येईल |
| २१. | भुईभाडे आकारणी | रु. १०/- प्रति वर्ष प्रति मीटर या प्रमाणे २० वर्षासाठी एकरकमी रु २००/- प्रति मीटर |
| २२. | मायक्रोट्रेन्चींग | मायक्रोटेन्चींगव्दारे परवानगी देऊ नये |
| २३. | सुरक्षा अनामत | एकणु आय आय चार्जेसच्या १० टक्के |
| २४. | पर्यवेक्षक फी | एकुण आर आय चार्जेसच्या १५ टक्के |

वर नमुद केलेल्या रस्त्याचे प्रकारात तसेच उपरोक्त नविन प्रस्तावित केलेल्या दरात इतर स्वायत्त संस्था आकारत असलेल्या दराप्रमाणे दर आकारल्यास महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होणार आहे व विना परवानगी तसेच अटीशर्ती व सुरक्षीततेच्या नियमांचे पालन न करात खोदाई कामे करणाऱ्यावर दंडात्मक कारवाई करता येऊ शकेल. जे रस्ते नव्याने तयार करण्यात आले आहेत. त्यावर खोदाई करणेस शक्यतो मनाई करण्यात यावी. तथापी अपवादात्मक स्थितीमध्ये परवानगी देणे आवश्यक असल्यास दोषदायित्वाचा कालावधीस अनुसरून रक्कम आकारणी करावी.

वरील कामामध्ये खोदाईसाठी सरासरी १.०० मीटर रुंदीसाठी दर आकारण्यात यावेत. विविध सेवा संस्थामार्फत डक्ट/ केबल साठी आकारण्यात येणाऱ्या रस्ता फोड फी मधील सुरक्षा अनामत ही १ वर्षानंतर परत करण्यात यावी.

वरीलप्रमाणे दर आकारण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2015-16 /MG -5

ओपकारा प्राप्त दि. ०६/०१/२०१६ वेळ ११...

मा. ~~स्थायी समिती~~ / [illegible]

नोंद रजिस्टर अ.क्र. 02

नगरसचिव विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि. १८/०७/२०१६

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. १३८ : मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात महानगरपालिकेच्या एकूण ३५ शाळा कार्यान्वित आहेत. या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित केलेस देखरेख ठेवणे सोईचे होईल. याकामी सी. सी. टी. व्ही. कॅमेरे, डी. व्ही. आर खरेदी व इन्स्टॉलेशन याकामी अंदाजे ५० लाखापर्यंत खर्च अपेक्षित आहे. उपरोक्त कामी संगणक विभागाच्या "संगणक सॉफ्टवेअर, हार्डवेअर साहित्य खरेदी" या लेखाशिर्षा अंतर्गत रू. २.५० कोटी इतकी तरतूद करण्यात आलेली आहे. प्राप्त तरतूदीतून मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळांमध्ये सी. सी. टी. व्ही. यंत्रणा कार्यान्वित करणेकामी होणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेकरीता शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २१/१२/२०१५ वेळ ५.१५
मा. ~~स्थायी समिति~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ५२

लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०७/२०१६

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ९३७ )** :- महापौर चषक २०१६ आयोजित करणेसाठी खर्चास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेबाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरातील विविध शाळा, विद्यालय, महाविद्यालयातील होतकरू खेळाडूंच्या सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे तसेच सदर चोळाडूंना एक नविन व्यासपीठ उपलब्ध होऊन त्यामधील काही खेळाडू पुढे येऊन राज्य, राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावर आपले, आपल्या शहराचे नांव गौरन्वित करतील या हेतूने मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत शालेय क्रिडा स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी मा. महापौर यांनी कळविलेले आहे.

सदर स्पर्धेचे मोठ्या स्वरूपात व अतिशय कमी वेळेत आयोजन करावयाचे असल्याने या कामाच्या आयोजनाचा अनुभव असलेल्या संस्थांना सर्व कामासाठी नेमावे लागेल (Event Management Agency)

सदर महापौर चषक स्पर्धेतंर्गत खालील खेळ आयोजित करावयाचे आहेत.

१) कबड्डी
२) खो-खो
३) बास्केट बॉल
४) व्हॉली बॉल
५) फुटबॉल
६) लंगडी
७) क्रिकेट
८) बुध्दीबळ
९) टेबल टेनिस
१०) बॅडमिन्टन
११) पोहणे
१२) सायक्लिंग
१३) शरीर सौष्ठत्व
१४) गायन
१५) चित्रकला
१६) नाच
१७) एकांकीका स्पर्धा
१८) धावणे (Athlatyics)

वरील स्पर्धाच्या आयोजनासाठी सर्व साधारणपणे रोख बक्षिसे, ट्रॉफी यावर रु.१२.०० लक्ष, पंच, रेफरी, जज यांच्यावर रु.२३.०० लक्ष एवढा खर्च होईल. तसेच स्टेशनरी, स्कोअर शीट, खेळाचे साहित्य यावर रु.६.०० लक्ष एवढा तर खानपान, चहापाण्यावर रु.३.०० लक्ष, मिडीया पब्लीसीटी वर रु.१०.०० लक्ष, मंडप, खुर्च्या, माईक सिस्टीम व इतर साहित्य, फोटोग्राफी, व्हिडीयो शुटींग, टी-शर्ट कॅप, इ. वर रु.१३.०० लक्ष असे मिळून ६७.०० लक्ष एवढा खर्च होऊ शकेल. सदर कामावर होणाऱ्या खर्चासाठी सन २०१५-१६ या वर्षाच्या अर्थसंकल्पात "महापौर चषक" या लेखाशिर्षातर्गत रु.१.००

कोटी तरतूद उपलब्ध आहे. तथापीं (Event Management) ची नेमणूक करुन त्यांच्यामार्फत व स्पर्धेच्या आयोजनाची जबाबदारी टाकण्यासाठी निविदा मागवाव्या लागतील व सदर निविदा मा. स्थायी समितीने मान्य केल्यानंतर संस्थेस कार्यादेश देऊन पुढील कामे करावी लागतील. तसेच स्पर्धेच्या विविध स्तरावरील नियंत्रणासाठी विविध विभागप्रमुख, अधिकारी कर्मचारी यांना कामे नेमून द्यावी लागतील.

तरी महापौर चषक २०१६ स्पर्धेचे आयोजन करण्यासाठी होणाऱ्या खर्चास व पुढील आवश्यक सर्व प्रक्रीया पार पाडण्यास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

11.15

गोषवारा प्राप्त २७/०१/२०१८ वेळ ११.१५

~~मा. स्थायी समिती~~ / गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ०४

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. :- १३८   महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेस मान्यता मिळणेबाबत.

महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील विविध पदावर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना विविध वेतनोत्तर लाभ देण्यात येतात. महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना सहावे वेतन आयोग लागू झाल्यानंतर सदर लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणे आवश्यक होते. याबाबत कर्मचारी यांचेकडून तसेच कर्मचारी संघटनेकडून सदर लाभाच्या दरात वाढ करणेबाबत वारंवार मागणी होत आहे. या अनुषंगे महानगरपालिकेतील कर्मचाऱ्यांना खालीलप्रमाणे वेतनोत्तर लाभाच्या दरात वाढ/सुधारणा करणेचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

| अ.क्र. | वेतनोत्तर लाभाचा प्रकार | ज्या कर्मचाऱ्यांना सदरचा लाभ देण्यात येतो त्याचा तपशिल | सध्या देण्यात येत असलेला दर | वाढ/सुधारणा करावयाचे लाभाचे दर |
|---|---|---|---|---|
| १. | धुलाई भत्ता | अग्निशमन विभागातील अधिकारी /कर्मचारी, वाहन चालक, व्हॉलमन, प्लंबर, फिटर, शिपाई, मजूर, वैद्यकीय सेवेतील कर्मचारी इत्यादी. ज्या कर्मचाऱ्यांना गणवेश देण्यात येतो ते अधिकारी/कर्मचारी | रु.३०/- प्रती महिना | रु.१५०/- प्रती महिना |
| २. | घाण भत्ता | प्रत्यक्ष साफसफाईचे काम करतात अशा सफाई कामगारांना | रु.३०/- प्रती महिना | रु.१००/- प्रती महिना |
| ३. | फिरती भत्ता | महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील तृतीय व चर्तुथ श्रेणी या संवर्गातील कर निरिक्षक, वरिष्ठ लिपीक, सर्व्हेअर, स्वच्छता निरिक्षक, इमारत निरिक्षक, कनिष्ठ अभियंता, तसेच शिपाई व इतर चर्तुथ श्रेणी कर्मचारी यांना महानगरपालिकेच्या कामकाजानिमित्त, कार्यालय सोडून मनपा क्षेत्रात अथवा मनपा क्षेत्राच्या बाहेर मुंबई, ठाणे येथे ज्या कर्मचाऱ्यांना फिरती करावी लागते तसेच ज्या कर्मचाऱ्यांना वाहन उपलब्ध करुन दिले जात नाही, अशा कर्मचाऱ्यांना. | रु.१०००/-प्रती महिना | रु.१२००/- प्रती महिना |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४. | सायकल भत्ता | पाणीपुरवठा विभागातील व्हॉलमन, प्लंबर,फिटर इत्यादी व सार्वजनिक बांधकाम विभागातील चर्तुथ श्रेणी कर्मचारी यांना दैनंदिन कामानिमित्त महानगरपालिकेच्या क्षेत्रात फिरावे लागते अशा कर्मचाऱ्यांना सायकली देण्याचे प्रस्तावित आहे. अशा कर्मचाऱ्यांना सायकल भत्ता देणे आवश्यक आहे. | सद्यस्थितीत सायकल भत्ता अदा केला जात नाही. | रु.२००/- प्रती महिना |

वरीलप्रमाणे नमुद पदावरील कर्मचाऱ्यांना वेतनोत्तर लाभ दरात वाढ/सुधारणा करुन, लाभ अनुज्ञेय करणेस मान्यता मिळावी ही विनंती.

(अच्युत हांगे) 07/16

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. 0६/07/२०१६ वेळ 0४.३०

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. 03

लिपीक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.१८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (१४०) - मिरा भाईंदर शहरातील आरक्षण क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पीटल) विकसीत करणेबाबत. व चालविणेबाबतचा प्रस्ताव राज्य शासनास पाठविणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराच्या मंजूर विकास योजनेमध्ये मौजे नवघर, स.क्र. (जुना) ४५२पै., ३९२पै., ३९०पै., ३९१पै., ३९३पै. (नविन) १५२पै., १५३पै., १५४पै., १६१पै., १६२पै. या जागेमध्ये आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पीटल) हे आरक्षण दर्शविलेले असून मंजूर विकास योजनेप्रमाणे सदर आरक्षणाचे एकूण क्षेत्र १३६०० चौ.मी. आहे. यापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील क्षेत्र ९५०.०३ चौ.मी. असून उर्वरीत क्षेत्र खाजगी मालकीचे आहे.

सदरचे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये जागामालकास विकसीत करणेसाठी यापुर्वी जा.क्र. मनपा/नर/८६०/२००७-०८, दि.११/०६/२००७ अन्वये रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करण्यासाठी नाहरकत दाखला दिलेला असून सदरच्या परवानगीसाठी दि.१७/१०/२००८ रोजी १ वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे. सदरच्या परवानगीची मुदत संपलेली असून परवानगी व्यपगत झालेली आहे.

विकास योजनेमधील आरक्षणे समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकास योजनेची अंमलबजावणी संदर्भात नविन विनियम अंतर्भुत करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार दि.३०/०४/२०१५ अन्वये प्रस्तावित केलेले आहेत.

त्याप्रमाणे आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पीटल) या आरक्षणाच्या क्षेत्रापैकी ५०% प्रमाणेचे बांधीव क्षेत्र जागामालक महानगरपालिकेस हस्तांतरीत करणेस तयार असल्यास सदरचे आ.क्र. ३०२ (म्युनिसिपल हॉस्पीटल) हे जागामालकास / विकासकास समावेशक आरक्षणाच्या तरतुदी अन्वये विकसीत करणेसाठी परवानगी देण्यास किंवा संपुर्ण जागेवर हॉस्पीटल बांधून चालविण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेसाठी मा. महासभेची मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. १३/०७/२०१८ वेळ १२.१५
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ......१३......
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१ /२०१६

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ७४१ ) :-** भाईंदर (पूर्व) चौपाटी सुंदरीकरण नविनीकरण करणेकरीता खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास योजनेत भाईंदर (पूर्व) येथे आरक्षण क्र.१२२अ चौपाटीसाठी राखीव आहे. सदर जागा मौजे नवघर सर्व्हे क्र.१५ (नवीन), सर्व्हे क्र.२०९ (जुना) मध्ये मोडत असून सदर आरक्षणाचे क्षेत्र मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील दि.०७/१०/२०१० रोजीच्या आदेशान्वये संरक्षणासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतर केले आहे. सदर ठिकाणी तत्कालीन नगरपरिषद असतांना १९९२ पासून श्रीगणेश विसर्जन होत असल्याने वेळोवेळी आवश्यक व्यवस्था तसेच दुरूस्तीकरण करण्यात आले आहे. सदर जागेवर मोठयाप्रमाणावर नागरीक, रहिवाशी व मुले दररोज फिरावयास तसेच खेळण्यास येत असल्याने मोठयाप्रमाणावर गर्दी होत असते. सदर ठिकाणी असलेल्या व्यवस्थेत दुरूस्ती कामे व रंगकाम इ. कामे करून सुंदरीकरण, नविनीकरण करण्याची आवश्यकता असून चौपाटी परीसराची शोभा वाढणार आहे. सदर कामाकरीता तांत्रिक सल्लागार नेमण्याबाबत निर्णय झाला होता. तथापी वारंवार निविदा मागवुन देखील निविदा प्राप्त न झाल्याने रू.१,००,००,०००/- एवढया खर्चाचे अंदाजपत्रक महानगरपालिकेमार्फत तयार करण्यात आलेले आहे.

तरी सदर कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यास व आवश्यक मान्यता घेऊन कामे करण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2015-16 /MS-7

गोपत्रारा प्राप्त दि. ८/१/२०१६ वेळ २.११

~~मा. स्थायी समिति~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर क्र. ११

लिपिक

नगरसचिव विभाग.

# <u>मिरा-भाईंदर महानगरपालिका</u>

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १५३ )** :- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मंजूर विकास कामात फेरबदल / सुधारणा करणे व कामांना आर्थिक प्रशासकीय मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. महासभा दि.०१/०७/२०१५ ठराव क्र.१६ अन्वये खालील कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स समोरील स्प्रींग रोझ ते मेरी गोल्ड पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व दोन्ही बाजूस गटारे बांधणे. | रु. २,०३,४३,४००/- |
| २ | मिरारोड (पूर्व) कनकिया वासुदेव कॉम्पलेक्स रस्ता रॉडस्टोन ते एस.टी.पी. पर्यंत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु.३,०५,११,४००/- |
| ३ | हटकेश मंगल नगर जंक्शन ते १५ नंबर बस स्टॉप पर्यंत रस्त्याच्या डाव्याबाजूस गटार बांधुन स्लॅब टाकणे. | रू. २४,९३,७००/- |
| ४ | मिरारोड (पूर्व) महापौर निवास रस्त्यावरील उर्वरीत ठिकाणी गटारे बांधणे | रू. ४९,८७,६५०/- |
| ५ | मिरारोड (पूर्व) बेवर्लीपार्क मेरीगोल्ड १ व २ ते मंगलनगर पर्यंत रस्त्यालगत गटारे बांधणे व १५.०० मी. डी.पी. रस्ता तयार करणे | रु.२,२०,७९,६५०/- |

सदर कामाबाबत निविदा प्रक्रीया करून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने कामे मंजूर करण्यात आलेली आहेत. तथापी, दरम्यानच्या काळात सदर कामे ही विकास हक्क प्रमाणपत्राच्या मोबदल्यात करण्यासाठी परवानगी दिल्याने प्रस्तावित कामे रद्द करावी लागणार आहेत. सदर कामावर खर्च होणार नसल्याने रक्कमेची बचत होणार असून त्याऐवजी नवीन कामे प्रस्तावित करावी लागणार आहेत. त्यानूसार खालील कामे प्रस्तावित करम्यात येत आहेत.

| अ.क्र. | विकास कामाचे नाव | अंदाजित खर्च |
|---|---|---|
| १ | मिरारोड (पुर्व) कनकिया येथील युनिक गार्डन परिसरातील रस्त्यालगत गटारे बांधून स्लॅब टाकणे. | रु. ४४,७८,१००/- |
| २ | हटकेश विनय नगर ते राज मंदिर कॉम्प्लेक्स पर्यत १८.०० मी. डी.पी. रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु.१,८५,९०,४५०/- |
| ३ | मिरारोड (पुर्व) कनकिया येथील आरक्षण क्र. २५१ व २५२ जागेलगत गटार व कुंपणभिंत बांधणे. | रु.५७,८७,८००/- |
| ४ | मिरारोड (पुर्व) कनकिया येथील आरक्षण क्र. २५० ते तिवारी कॉलेज पर्यत विकास योजना रस्ता तयार करणे व गटारे बांधणे. | रु.१,३९,५४,३५०/- |
| ५ | राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर वसानी पेट्रोल पंप ते दिल्ली दरबार उघाडी पर्यंत नाला बांधणे व उर्वरीत रस्ता तयार करणे. | रु.२,२०,२२,९५०/- |

वरील प्रमाणे कामे बदलून प्रस्तावित नविन कामांना प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/15-16/DK/MG-16

गोषवारा प्राप्त दि. ८/१/२०१६ वेळ २.१०

ना. ~~स्थायी समिती~~ / नगरसचिव गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १२

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

### //गोषवारा//

**प्रकरण क्र. (७४४) :- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५ अंतर्गत संगणकीय सेवा उपलब्ध करणेबाबत आर्थिक प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टीकोनातून महाराष्ट लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५, दि. २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. या अध्यादेशातील कलम-३ अनुसार नागरिकांना दैनंदिन जीवनामध्ये सातत्याने आवश्यक असणाऱ्या व ज्या लोकसेवांचा जास्तीत जास्त नागरिकांनी फायदा घेतला आहे व ज्या सेवा महत्वाच्या आहेत अशा माहनगरपालिकेने जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशिल संदर्भिय शासन निर्णयासोबत सहपत्र-अ नुसार (सेवा, आवश्यक कागदपत्र व नियम कालावधी, फी, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय प्राधिकारी, द्वितीय अपिलीय प्राधिकारी) अधिसुचित करण्यात आला आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

शासन निर्णय, नगर विकास विभाग क्रमांकः एमसीओ-२०१५/प्र.क्र.१८९/नवि-१४, दि. २३ जून २०१५ चे

सहपत्र - "अ"

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश-२०१५

(कलम-३ अन्वये महानगरपालिकेनी जाहीर करावयाचा लोकसेवेचा तपशील)

| अ.क्र. | लोक सेवांची सुची | आवश्यक कागद पत्र | फी | नियत काल मर्यादा | पदनिर्देशित अधिकारी | प्रथम अपिलीय प्राधिकारी | द्वितीय अपिलीय प्राधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | जन्म प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | उपायुक्त (आरोग्य) |
| ०२. | मृत्यु प्रमाणपत्र देणे | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | वैद्यकीय अधिकारी | वैद्यकीय आरोग्य अधिकारी | उपायुक्त (आरोग्य) |
| ०३. | विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) वास्तव्याचा पुरावा.<br>३) वयाचा पुरावा<br>४) विवाहासाठी उपस्थित साक्षीदारांचे स्वयंघोषणापत्र<br>५) ९० दिवसांनंतर नोंदणी असल्यास स्वयंघोषणापत्र | ९० दिवसांपर्यंत रू. ५०/-<br>१ वर्ष कालावधी पर्यंत रू. १५०/-<br>१ वर्षानंतर रू. २५०/- | ३ दिवस | वरिष्ठ लिपिक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०४. | मालमत्ता करउतारा देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०५. | थकबाकी नसल्याचा दाखला देणे. | विहित नमुन्यातील अर्ज | प्रति प्रत रू. १०/- | ३ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| ०६. | अ) दस्तऐवजाच्या आधारे मालमत्ता हस्तांतरण नोंद प्रमाणपत्र देणे | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला<br>३) दस्तऐवजाची प्रत (खरेदी खत/बक्षीस पत्र/ वाटणीपत्र व इतर) | रहिवास- रू. १०००/-<br>वाणिज्य रू. १५००/- | १५ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |
| | ब) वारसा हक्काने मालमत्ता हस्तांतरण नोंद | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखला<br>३) वारसा हक्क प्रमाणपत्र | रू. ५०/- | १५ दिवस | कर निरिक्षक | मुख्य लिपिक | प्रभाग अधिकारी |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०७. | झोन दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सर्व्हे उतारा<br>३) मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ७ दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| ०८. | भाग नकाशा देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) ७/१२ उतारा/सिटी सव्हे उतारा<br>३) मोजणी नकाशा/ सिटी सर्व्हे नकाशा | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ३ दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| ०९. | बांधकाम परवाना देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) वास्तु विशारदाचा दाखला<br>३) मालकी हक्काची कागदपत्रे<br>४) बांधकाम आराखडा नकाशा ५ प्रती<br>५) मोजणी नकाशा<br>६) मंजुर रेखांकनाची प्रत | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ६० दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| १०. | जोते प्रमाणपत्र. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | १५ दिवस | सर्व्हेअर | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| ११. | भोगवटा प्रमाणपत्र देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र<br>३) जोते प्रमाणपत्र<br>४) घर मालक/वास्तुविशारद यांचे पुर्णत्वाचे स्वयंघोषणापत्र | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ३० दिवस | कनिष्ठ अभियंता | सहाय्यक नगररचनाकार | नगररचनाकार |
| १२. | नळजोडणी देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) जागा मालकी कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखल | १/२" इंच व्यास (घरगुती) रू. ३०,०००/-<br>१/२" इंच व्यास (वाणिज्य) रू. ४५,०००/-<br>१" इंच व्यास (घरगुती) रू. ५०,०००/-<br>१" इंच व्यास (वाणिज्य) रू. ७५,०००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप-अभियंता | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| १३. | जलनिःसारण जोडणी देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) जागा मालकी कागदपत्रे<br>३) थकबाकी नसल्याचा दाखल | ६" इंच व्यास (प्रत्येक कनेक्शन) रू. २५,०००/-<br>६" इंच व्यास व्यासापेक्षा जास्त (प्रत्येक कनेक्शन) रू. ५०,०००/-<br>रो-हाऊस घरांसाठी रू. १५,०००/- | १५ दिवस | कनिष्ठ अभियंता | उप-अभियंता | कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) |
| १४. | अग्निशमन ना-हरकत दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखल<br>३) वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४) आग प्रतिबंधक उपाययोनांबाबातची रूपरेषा<br>५) कॅपिटेशन फी | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | ७ दिवस | सब-स्टेशन ऑफिसर | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त (अग्निशमन) |
| १५. | अग्निशमन अंतिम ना-हरकत दाखला देणे. | १) विहित नमुन्यातील अर्ज<br>२) थकबाकी नसल्याचा दाखल<br>३) वास्तुशिल्पकार यांचा अर्ज<br>४) अग्निशमन यंत्रणा उभारणी केल्याचे प्रमाणपत्र<br>५) लायसन्स एजन्सी यांचे | महानगरपालिकेने वेळोवेळी निश्चित केलेले दर | १५ दिवस | सब-स्टेशन ऑफिसर | प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी | उपायुक्त (अग्निशमन) |

(३)

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नमुना-अ प्रमाणपत्र<br>६) विकासक/सोसायटी यांचे अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत ठेवण्याचे हमीपत्र | | | | | |

वरील प्रमाणे १ ते १५ संगणकीकृत व ऑनलाईन सेवा सुरू करणेकामी व अग्निशमन परवानगी याकामी नव्याने संगणक आज्ञावली विकसित करणेकामी दि. ०४/११/२०१५ रोजी निविदा मागविणेत आलेली आहे. याकामी एकूण ३ निविदा प्राप्त झाल्या आहेत. परंतु या क्र. १ ते १५ मध्ये नमुद केलेल्या सेवा व नविन संगणक आज्ञावली पूर्ण क्षमतेने ऑन लाईन सेवा सुरू करणे व त्याचे पुढील ५ वर्षात देखभाल दुरूस्तीसह या सर्विसेस सक्षमपणे चालू राहण्याच्या दृष्टीने मा. महापौरासमवेत सखोल चर्चा झाली. वरीलकामी अ. क्र. १ ते १५ सर्विसेस , मालमत्ता कर आज्ञावली, पाणीपुरवठा कर आज्ञावली, जन्म मृत्यू आज्ञावली, विवाह नोंदणी आज्ञावली, फायर या विभागांसाठी नविन संगणक आज्ञावली, ऑटोडिसीआर ॲप्लीकेशनसोबत इंटीग्रेशन व कार्यरत आज्ञावलीचे डाटा पोर्टींग, मायग्रेशन कामी प्रथम वर्षासाठी रु. १,५०,००,०००/- व तसेच दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या , पाचव्या वर्षासाठी वार्षिक तांत्रिक सपोर्ट म्हणून प्रतिवर्ष रु. ३० लाख खर्च अपेक्षित आहे. गुणवत्ता, दर्जेदार, सुरक्षित व विश्वसनीय संगणक आज्ञावली विकसित करणेकामी अनुभवी व नामांकित कंपनीकडून संगणक आज्ञावली विकसित केल्यास नागरिकांना या आज्ञावलीद्वारे विनाविलंब सेवा पूरवठा करता येतील. संगणक व संगणक आज्ञावली खरेदी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. २.५० करोड तरतूद करण्यात आलेली आहे.

सदरकामी फेरनिविदा मागविणेस व उपरोक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

[illegible] प्राप्त दि. ४/१२/२०१५ वेळ 10.30

मा. [illegible] / [illegible]

नोंद रजिस्टर अ. क्र. ........................

[illegible] विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि.१८/०१/२०१६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( १८५ )**:- भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केटची पुर्नःबांधणी करण्याच्या अंदाजपत्रकास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

भाईंदर (पूर्व) खारीगांव मासळी मार्केट वाढीव मजल्याचे बांधकाम करून दुरूस्ती करून मजबुतीकरण करणेचे काम प्रस्तावित करण्यात आले होते, तथापी मार्केटची काही जागा खाजगी असल्याने व जागेबाबत वाद निर्माण झाल्याने सदर काम रद्द करण्यात आले होते. सद्यस्थितीत सदर जागा ताब्यात घेण्याची प्रक्रीया पूर्ण होत आलेली आहे.

सदर मार्केट जीर्ण झाल्याने त्याची दुरूस्तीचे काम करणे शक्य नसल्याने सदर मार्केटची नव्याने पुर्नःबांधणी करणे आवश्यक आहे. सदर कामी महानगरपालिकेच्या पॅनलवरील मे. एच.एम. राजे स्ट्रक्चरल कन्सल्टंट यांच्या कडून आराखडे व अंदाजपत्रक तयार करून घेण्यात आलेले असून मार्केटची नव्याने पुर्नःबांधणी करण्यासाठी रु.८२,२२,२००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

सदर कामासाठी तरतुद सन २०१५-१६ च्या "मार्केट बांधकाम" या लेखाशिर्षकातंर्गत तरतूद करण्यात आलेली आहे. तरी सदर कामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/15-16/DK/MG-12

गोषवारा प्राप्त दि.२८/१२/२०१५ वेळ ११.३० 
~~स्था. ... ... ...~~ गोषवारा
नोंद रजिस्टर क्र. 43
लिपिक
कक्ष/डेस्क विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०७/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (१४६) :-** मिरारोड (पूर्व) कनकिया परिसरात जेट्टी, विसर्जन धक्का बांधणे व पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्यासाठी विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) जैसल पार्क येथे विसर्जन धक्का असून सदर ठिकाणी भाईंदर (पूर्व), मिरारोड, राष्ट्रीय महामार्ग क्र. ८, दहिसर भागातील श्रीगणेश मुर्तीचे विसर्जन होत असते, त्यामुळे सदर धक्यावर मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होत असते. सदर धक्का खाडीपर्यंत वाढविण्याची गरज आहे. त्यामुळे सदर गर्दी व वाहतुक कोंडी कमी करण्यासाठी मिरारोड (पूर्व), दहिसर, राष्ट्रीय महामार्ग क्र.८, प्रभाग क्र.३१ मधील श्रीगणेश विसर्जन साठी कनकिया भागात खाडी किनारी नविन विसर्जन धक्का बांधणे आवश्यक झाले आहे.

भाईंदर (पूर्व) नवघर व एल.एन. तिवारी कॉलेज समोर कनकिया भागाच्या पर्यटनाच्या दृष्टीने व जलवाहतुकीच्या दृष्टीने विकास करण्यासाठी (विविध उपक्रम राबविणे, जेट्टी विकसित करणे) पर्यटन संचनालय, महाराष्ट्र शासन यांनी प्रकल्प अहवाल तयार करुन पर्यटन विभागास सादर करण्यास कळविलेले आहे. सदर कामाबाबत महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड व पर्यंटन विभागामार्फत संयुक्त पहाणी करण्यात आलेली आहे. सदर जेट्टी उभारण्यासाठी खाडी किनाऱ्यावर जाण्यासाठी रस्ता नसल्याने सदर रस्ता विकास आराखड्यात दर्शविण्यासाठी विकास योजनेत फेरबदल करावा लागणार आहे. तसेच सी.आर.झेड. प्राधिकरणाच्या मान्यता घेऊन तद्नंतर कामे करावी लागणार आहेत.

तरी वरील प्रस्तावानुसार भाईंदर (पूर्व) येथील विसर्जन धक्का खाडीपर्यंत क्रॉक्रीटीकरण करणे, कनकिया भागात विसर्जन धक्का तयार करणे, धक्का व रस्ता विकास योजनेत दर्शविणे, सी.आर.झेड प्राधिकरणाची मान्यता घेणे, सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन शासनास पाठविणे, जागा संपादन करणे, इ. कामे करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

PC-3/DK/2015-16/MG-5

11.15

गोपवारा प्राप्त दि. ०७/०९/२०१६ वेळ ११:१५

~~स. स्थायी समिती~~ [illegible] द्वारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ....०५..............

नाईक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. १८/०१/२०१६**

**// गोषवारा //**

**प्रकरण क्रमांक ( १४७ ) :-** राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ वर सम्राट हॉटेल समोर रस्ता ओलांडण्यासाठी पादचारी पूल बांधणे बाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ जात असून सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मालकीचा आहे. सदर महामार्गावरील महाजनवाडी, मिरा गावठण येथील रहीवाशी तसेच शाळकरी मुलांना सदर महामार्ग वारंवार ओलांडावा लागतो. सदर महामार्गावर मोठया प्रमाणावर वाहतूकीचा ताण असल्याने वाहने वेगाने जात असल्याने रहीवाशी, पादचारी व शाळकरी मुलांना जीव मुठीत धरुन रस्ता ओलांडावा लागतो. सदर जागेवर पादचारी पूल बांधण्यासाठी मा.श्री. राजन विचारे, खासदार यांनी खासदार निधीतून रु.७५.०० लक्ष रक्कम उपलब्ध करुन देण्याचे मा. जिल्हाधिकारी कार्यालयास कळविलेले असून मा. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिरा भाईंदर महानगरपालिकेस अंदाजपत्रक सादर करण्याबाबत कळविलेले आहे. सदर महामार्ग भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या मालकीचा असल्याने त्यांना सदर कामाबाबत कळविलेला असता त्यांनी सदर काम महानगरपालिकेमार्फत करण्यास नाहरकत पत्र दिले आहे. सदर कामाचे तांत्रिक सल्लागार मे. एच.एम.राजे कन्सल्टंट प्रा.लि. यांच्यामार्फत रु.२,१७,९३,०००/- रकमेचे अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

त्यापैकी रु. ७५,.०० लक्ष खासदार निधितून उपलब्ध होणार असून उर्वरीत रु.१,४२,९३,०००/- एवढा निधी महानगरपालिकेस उपलब्ध करुन दयावा लागणार आहे, त्यासाठी अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद करावी लागणार आहे. तरी प्रस्तावित कामाबाबत विचार विनिमय करुन निर्णय होणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-5/DK/2015-16 /MG 4

11.15

गोषवारा प्राप्त :- ०६/०१/२०१६ वेळ ११:१५

~~स्था. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ........०८..............

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## संगणक विभाग
## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

### //गोषवारा//

**प्रकरण क्र. (१४८)** :- मिरा भाईंदर महानगरपालिकेचा विविध विभागाचे अभिलेख स्कॅनींग व डिजीटायजेशन करणे कामी ई निविदा मागविणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत.

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागाचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायजेशन करणे आवश्यक आहे. याकामी निविदा मागविणेपूर्वी महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून अभिलेख्यांची अंदाजित संख्या घेण्यात आली आहे. विविध विभागाकडून प्राप्त झालेल्या अभिलेखांची एकत्रित संख्या खालीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. राभूअ२०१४/प्र. क्र. १८२/ल-१ मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२ दि. २२/१०/१४ रोजीच्या मंजूर दरानुसार अ. १ ते ५ कामी खालीलप्रमाणे खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | आकारमान | पृष्ठ संख्या | दर रु. | एकूण रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | ए-४/लिगल | ७९,३६८९१ | ०.९७ | ७६,९८,७८४ |
| 2 | ए-३ | १,७८,००० | १.८४ | ३,२७,५२० |
| 3 | ए-२ | २,८१,२७० | ८ | २२,५०,१६० |
| 4 | ए-१ | १,२०,००० | ८ | ९,६०,००० |
| 5 | ए-० | - | ८.२१ | - |
| | एकूण | ८५,१६,१६१ | | रु. १,१२,३६,४६४/- |

| Sr. No. | Particualars | Gross Amount |
|---|---|---|
| 1 | DMS License ,DMS services,Configuration and customization of DMS Integration with other MBMC Application, Hosting Charges,User Training, Helpdesk/Technical support,Configuration and customization of DMS, Indexing Rate per file, Binding rate per file, Numbering rate per file | 11,23,646/- |

याकामी एकूण पृष्ठ संख्या अंदाजे ८५,१६,१६१ स्कॅनिग व डिजिटायजेशन करणेकामी अंदाजे रु. १,२३,६०,११०/- इतका खर्च अपेक्षित आहे. संगणक व संगणक आज्ञावली खरेदी या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु. २.५० करोड तरतूद करण्यात आलेली आहे.

सदरकामी निविदा मागविणेस व उपरोक्त कामी आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

5/01/16

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

[illegible] आवश्यक
स्पेसिफिकेशन प्रमाणे व [illegible]
सदर [illegible]
दि. [illegible]
[illegible]
[illegible] नगरसचिव

गोषवारा प्राप्त दि. ५/१/२०१६ वेळ ५.००
मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर क्र. ०१

[signature] ५/१/१६
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

मा. महासभा
सभा दि :-१८/०७/२०१६

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. १४८ -केंद्र शासन पुरस्कृत "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" "National Urban Livelihood Mission" "शहरी बेघर निवारा नुतनीकरण/चालविणेबाबतचा विषय मा. महासभेसमोर ठेवणेबाबत.

संदर्भ :- नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम २०१४/प्र.क्र.१०४/ नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान उपजिविका अभियान" अंतर्गत महानगरपालिका हद्दीमध्ये नगरविकास विभागाचा शासन निर्णय क्रमांक एनयुएलएम २०१४/प्र.क्र.१०४/ नवि-१४ दि.२८ ऑगस्ट २०१४ या शासन निर्णयाप्रमाणे "राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" यामधील भौतिक उद्दीष्टाप्रमाणे ०५ शहरी बेघर निवारे स्थापन करणेबाबत सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार मा. अति. आयुक्त सो. दि.०७/०५/२०१५ रोजीच्या निर्देशाप्रमाणे दि.१४/०५/२०१५ रोजीच्या "लोकमत" वृत्तपत्रात जाहिरात देवुन मिरा भाईंदर महानगरपालिकेतील ०५ ठिकाणी "शहरी बेघर निवारे" संचलन व व्यवस्थापनासाठी शासकीय व अशासकीय नोंदणीकृत सामाजिक संस्थेकडुन अर्ज मागविण्यांत आले होते. सदर जाहिरातीनुसार खालील ०६ संस्थाचे अर्ज प्राप्त झालेले आहेत.

| अ. क्र. | उपलब्ध रात्र निवारे | बेघर निवाऱ्यांची अंदाजित क्षमता | संचलन व देखभालीसाठी प्राप्त अर्जानुसार नियुक्त करण्यात आलेली संस्था |
|---|---|---|---|
| १ | भाईंदर (पु) खारीगांव शाळा इमारत १ ला मजला | ५० | सिध्दीविनायक महिला बालकल्याण शिक्षण प्रसारक ट्रस्ट |
| २ | मिरा रोड आरक्षण क्र.१८१ १ ला मजला | ५० | ओम साई समाज विकास संस्था |
| ३ | काशिगांव आरक्षण क्र. ३१८ २ रा मजला | १५० | प्रज्वलीत ज्ञानदीप सामाजिक संस्था |
| ४ | मौजे नवघर स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१ ॲमिनीटी स्पेस मधील तळ व १ ला मजला मिरा रोड(पु) | १५० | श्री हत्ता सामिलानी, मुंबई |
| | मौजे नवघर स.क्र.४७२/१ ४५४,४५३/१ ॲमिनीटीस्पेस मधील दुसरा मजला | ५० | जनजीवन सहारा सामाजिक फांऊडेशन |
| ५ | अग्निशमन केंद्र, दुसरा मजला, भाईंदर (प.) | ५० | निर्मराज आदिवासी महिला बालविकास संस्था |

परंतु मा. महासभा ठराव क्र ९० प्रकरण क्र.९४ या अन्वये फक्त अनु क्र.१ व २ या जागेमध्ये रात्रनिवारे चालविण्याबाबत ठराव करण्यात आला होता. पण सद्यस्थितीमध्ये रात्रनिवारे हे शासननिर्णयाप्रमाणे "शहरी बेघर निवारे" करणेबाबत निर्देश देण्यात आले आहेत. परंतु अ.क्र. ३ ते ५ या जागेवर "शहरी बेघर निवारे" चालविण्याकरीता मा. महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे, जेणेकरुन मा. संचालक प्रशासन, वरळी, यांच्याकडुन सदर "शहरी बेघर निवारे" नुतनीकरण व संचलन व्यवस्थापना साठी तरतुद मंजुर होणार आहे. तरी सदरचा विषय मा. महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/०१/२०१६

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.१५०- मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस व अस्तित्वातील बसेस चालविणेसाठीचा धोरणात्मक निर्णय घेणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात JnNURM-II या योजने अंतर्गत मंजूर १०० व JnNURM-I या योजनेतील ५० बसेस असे एकूण १५० बसेस शहरातंर्गत व शहराबाहेरील बस मार्गावर चालविणेचे आहेत.

केंद्र शासनाच्या JnNURM-II या योजने अंतर्गत मंजूर बसेस व सद्यस्थितीत ५० बसेस चालविणेसाठी NCC (Net Cost Contract) व GCC (Gross Cost Contract) ह्या दोन तत्वापैकी एका तत्वावर महानगरपालिकेच्या बसेस खाजगी Operator मार्फत चालविणेचे आहे. दोन्ही प्रकारापैकी कोणत्याही एका प्रकारात बसेस चालविणेकामी खाजगी ठेकेदाराची नियुक्ती करावी लागणार आहे.

खालीलप्रमाणे दोन्ही तत्वांचे स्वरूप देण्यात येत आहे.

**A) NCC (Net Cost Contract)**

१) महानगरपालिका बस खरेदी करून ठेकेदारास चालविणेस देईल.

२) खाजगी ठेकेदार नेमून महपालिकेने दिलेल्या भाडेदर व बस मार्गावर नियोजित बसेस चालविणे.

३) खाजगी ठेकेदार तिकिट दर जमा / वसूल करील.

४) महापालिकेला नेमलेल्या ठेकेदाराकडून प्रति कि. मी. / प्रति बस स्वामित्व धन दिले जाईल.

५) यामध्ये महानगरपालिकेला कोणताही कर्मचारी नेमणूक व तद्अनुषंगाने येणारा खर्च करावा लागणार नाही.

६) बसेस चालवित असताना कोणत्याही प्रकारचा धोका, अपघात जोखीम प्रत्यक्ष महानगरपालिकेला सोसावा लागत नाही.

७) यामध्ये ज्यावेळी किंवा नियोजित मार्गावर कमी उत्पन्न आहे. त्यावेळी किंवा त्या बस मार्गावर ठेकेदाराकडून बसेस न चालविणेची शक्यता नाकारता येत नाही.

८) ठेकेदारास पुरेसे उत्पन्न मिळाले नाही तर दुरूस्ती अभावी बसेस नादुरूस्त स्थितीत राहून त्याचा परिणाम थेट बस ऑपरेटींगवर होतो.

**B) GCC (Gross Cost Contract)**

१) महानगरपालिका बस खरेदी करून ठेकेदारास चालविणेस देईल.

२) महानगरपालिकेच्या बसेस ठेकेदाराकडून चालविण्यात येतील.

३) महानगरपालिकेकडून तिकिट दर जमा / वसूल केला जाईल त्याकरिता वाहक, निरिक्षक, प्रवर्तक, हिशोब ठेवणेकरिता (जसे रोकड, तिकिट) कर्मचारी वर्ग नेमावा लागेल.

४) महापालिका बसमार्ग, वेळ (Bus Scheduled) देईल त्याप्रमाणे बसेस ठेकेदाराकडून चालविणेत येते, वाहन चालक, इंधन, वंगण, दुरूस्ती, अपघात जोखीम ही बाब ठेकेदाराच्या अधिन असेल.

५) ठेकेदारास प्रति कि.मी प्रमाणे मंजूर दराप्रमाणे देयक प्रदान केले जाईल (देयक कालावधी साधारणतः १५ दिवस)

६) यामध्ये ठेकेदारास चालविणेत येणाऱ्या बसेसचे निश्चित प्रति कि. मी. प्रमाणे देयक मिळत असल्याने बसेस वेळेनुसार चालविल्या जातात व सुस्थितीत ठेवल्या जातात.

७) बसेस चालवित असताना कोणत्याही प्रकारचा धोका प्रत्यक्ष महानगरपालिकेला सोसावा लागत नाही.

८) महानगरपालिकेस तिकिट विक्री पासून जमा झालेली रक्कम व प्रत्यक्ष ठेकेदारास देय देयक यामध्ये तफावत असल्यास ती रक्कम महानगरपालिकेस स्वतः द्यावी लागेल.

९) ठेकेदारास त्याचे होणार देयक मिळत असल्यामुळे शहरवासियांना बसेस सेवा उत्तम दिली जाते.

वरील दोन्ही तत्वांच्या कामाच्या स्वरूपानुसार व दि. ३१/०८/२०१५ रोजी केंद्र शासनामार्फत नियुक्त केलेली मे. डिलॉईट यांचे प्रतिनिधी यांचे समवेत झालेल्या बैठकीतील चर्चेनुसार तसेच दि. ०८/०९/२०१५ रोजी ESCBS अंतर्गत उपस्थित जागतिक बँकेच्या प्रतिनिधी समवेत झालेल्या चर्चेनुसार GCC with Incetive वर आधारित ऑपरेटर नेमावे असे सुचविणेत आले.

तरी मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमासाठी JnNURM अंतर्गत प्राप्त होणाऱ्या बसेस व अस्तित्वातील बसेस वरील दोन्ही तत्वापैकी एका तत्वावर चालविणेसाठी व तसे खाजगी ठेकेदार निविदा मागवून अंतिम करण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

F:\Harshala\Pimpale Madam\Goshwara - Dhornatmack nir,.docx

गोषवारा प्राप्त दि. १५/१ /२०१६ वेळ १२.३०

मा. स्थायी समिती ... चे कडील

नोंद रजिस्टर ... २८ ...

दिनांक १५/१/१६

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१ /२०१६

## सार्व. आरोग्य विभाग

// गोषवारा //

**प्रकरण क्र. :-१५१ महापालिका क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या "स्वच्छ महाराष्ट्र अभियानाबाबत".**

केंद्र शासन स्वच्छ भारत अभियान दि. ०२ आक्टोबर, २०१४ पासून सुरू करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियान सुरू करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र. स्वमअ २०१५/प्र.क्र.२४९/नवि -३४, दि. १९ नोव्हेंबर, २०१५ नुसार शहरातील हगंदारी मुक्त करणे, घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कचरा गोळा करणे, वाहतुक करणे, शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करणे, इत्यादी बाबींची अंमलबजावणी करण्याबाबत उपरोक्त शासन परिपत्रकानुसार मा. महासभेस अवगत करणेबाबत कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. १५ मे, २०१५ रोजी स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत "सप्तपदी स्वच्छतेची" संकल्पना मांडलेली आहे. त्यामध्ये खालील संकल्पनांचा समावेश केलेला आहे.

प्रत्येक प्रभाग समितीमध्ये स्वच्छता अभियानाबाबत जनजागृती करून, मिरा भाईंदर शहर स्वच्छ करण्यासाठी मा. नगरसेवक व नागरीकांचा सहभाग घेण्यात येत आहे.

"स्वच्छ महाराष्ट्र अभियान" अंतर्गत शहरातील प्रत्येक कुटूंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे, शहर हगणदारी मुक्त करणेकामी महापालिकेमार्फत प्रत्येक कुटुंबाकडून अर्ज मागवून वैयक्तिक शौचालय बांधणेकामी पात्र लाभार्थ्यांना अनुदान वाटप करून वैयक्तिक शौचालय बांधणेची खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

| Date | Form Received | Forms Uploaded | Forms Verified | Forms Approved | Forms Rejected | Toilet Under Construction | Construction Completed | Funds Distributed |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 05/01/2016 | 950 | 906 | 906 | 791 | 115 | 632 | 104 | Rs. 54,61,000/- |

या व्यतिरिक्त मा. नगरसेवकांना दि. ०८/१२/२०१५ रोजीच्या पत्राद्वारे त्यांच्या वॉर्डातील इच्छुक नागरीकांना वैयक्तिक शौचालय बांधण्यासाठी दि. २८/१२/२०१५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. त्यानुसार नागरीकांमार्फत ६५० अर्ज प्राप्त झाले असुन, सदरचे अर्ज केंद्र शासनाच्या संकेत स्थळावर अपलोड करण्याची कार्यवाही सुरू आहे.

त्याचप्रमाणे मनपा. क्षेत्रात एकुण २६ ठिकाणी Community Toilet बांधणेची निविदा प्रक्रिया सुरु आहे. तसेच मिरा भाईंदर शहरातील कचऱ्याचे संकलन, वर्गीकरण करून वाहतुक करण्यात येत आहे. सदर कचऱ्यावर शास्त्रौक्त पध्दतीने प्रक्रिया करणेकरीता तंत्रज्ञान देणे कामी आय.आय.टी. मुंबई यांची सल्लागार म्हणुन नेमणुक करण्यात आली आहे. शहरातील निघणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करणे कामी पाणी पुरवठा विभागामार्फत भुमिगत गटारे बांधणेची कार्यवाही सुरु आहे.

उपरोक्त कामी केंद्र व राज्य शासनाने दिलेल्या सुचनेनुसार स्वच्छता अभियान अंतर्गत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा. महासभेपुढे माहितीस्तव सादर.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Raj Documents\STANDING GOSHVARA\Swachh Maharastra Abhiyan 5-1-2016.docx

गोषवारा प्राप्त दि०७/०१/२०१५ वेळ सायं ०४:१५ वा.

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १०

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

महासभा दि :-१८/०१/२०१६

## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र.१५२- अंध व अपंग योजने अंतर्गत "अंध व अपंग व्यक्तीसाठी वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक मदत"

मिरा भाईंदर महानगरपालिका अपंग कल्याण योजने अंतर्गत सन २०१५-१६ या वर्षामध्ये अपंग सर्व्हेक्षणानुसार अंदाजीत २५०० अपंग व्यक्ती आहेत. अंध व अपंग व्यक्तींना वैद्यकीय उपचाराकरीता आर्थिक सहाय्य देणेबाबत ची योजना मनपा क्षेत्रामध्ये सुरु करावयाची आहे. त्यासाठी "अधं व अपंग उपचाराकरीता आर्थिक मदत" या लेखाशिर्षाखाली रु.२५ लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे.

सदर योजने मध्ये अपंग व्यक्तींना उपचारासाठी एकुण उपचाराच्या ५०% रक्कम हि ज्या हॉस्पिटल मधुन उपचार घेतले आहे त्या संबंधीत हॉस्पिटलला दिले जाईल. सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी च्या अटीशर्ती खालीलप्रमाणे

१) ४० % पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा ठाणे, सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला
२) रहिवाशी दाखला (Domicile certificate)
३) सदर उपचारासाठी डॉक्टरांकडील कागदपत्रे (Doctor reference letter)
४) उपचारानंतरच्या बिलांची मुळप्रत.
५) पिवळे किंवा केशरी शिधापत्रिका.
६) मा. नगरसेवकांचे शिफारसपत्र.

वरील प्रमाणे अपंग व्यक्ती अटीशर्तीची पुर्तता करतील अशा व्यक्तींना वैद्यकीय उपचारासाठी उपचाराच्या ५०% रक्कम अर्थसहाय्य म्हणुन "अधं व अपंग उपचाराकरीता आर्थिक मदत" या लेखाशिर्षातुन अदा करणेस मंजुरीसाठी सदरचा विषय हा मा. महासभेमध्ये ठेवण्यास शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

3.00

गोषवारा प्राप्त दि. ४/१२/२०१४ वेळ 3.00
मा. स्थायी समिती / ... बैठकीत
नोंद रजिस्टर अ. क्र. ५१ ...

नगरसचिव विभाग

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १५४ )** :- भाईंदर (पश्चिम) विनायक नगर येथील समाजमंदिराची पुर्नबांधणी करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पश्चिम) विनायक नगर येथे महानगरपालिकेचे समाजमंदिर असून सदर समाजमंदिराची पुर्नबांधणी करण्याची आवश्यकता आहे. सदर पुर्नबांधणीसाठी तांत्रिक सल्लागार मे. एच.एम.राजे कन्स्लटंट प्रा.लि. यांच्यामार्फत नकाशे तयार करण्यात आले असून स्टील्ट + ३ (पार्ट) मजले इमारतीच्या नकाशाना मंजूरी प्राप्त आहे. सदर समाजमंदीराच्या पहील्या मजल्यावर आरोग्य सेवा, दुसरा मजला सामाजिक उपयोगासाठी हॉल व तिसऱ्या मजल्यावर भागशः रुम बांधण्याचे प्रस्तावित आहे. सदर बांधकाम २५३.५२ चौमीटर क्षेत्राचे असून त्याकरीता रु.२,१२,१४,५००/- एवढा अंदाजपत्रकीय खर्च होणार आहे. स्थानिक नगरसेवक श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी त्यांचा सन २०१५-१६ या वर्षाचा रु.३८.०० लक्ष नगरसेवक स्वेच्छा व प्रभाग समिती निधी प्रथम टप्प्यात उपलब्ध करुन दिला असून सन २०१६-१७ या वर्षात उपलब्ध होणारा निधी देखिल देण्यात येणार असल्याचे कळविलेले आहे.

वरीलप्रमाणे प्रस्तावित समाजमंदीरासाठी एकूण रु.२,१२,१४,५००/- खर्च अपेक्षित असून नगरसेवक स्वेच्छा निधी व प्रभाग समिती निधी वगळता महानगरपालिकेस सदर कामासाठी तरतूद उपलब्ध करुन दयावी लागणारा आहे. तरी सदर कामाबाबत एकत्रित खर्चास प्रशासकीय, आर्थिक मान्यता देण्यास व टप्प्याटप्प्याने काम हाती घेण्याबाबत आर्थिक निधी उपलब्ध करुन देण्यास, निविदा मागविण्याबाबत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-5/DK/2015-16 /MG 3

11.15

गोषवारा प्राप्त दि. ०७/०१/२०१६ वेळ ११.१५ वा.
~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ०८

अधीक्षक
नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# मा. महासभा दि. १८ / ०७ /२०१६
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ९५५ <u>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठोक मानधनावर विविध विभागात कार्यरत असलेल्या ०७ कनिष्ठ अभियंता यांच्या सेवेच्या कालावधीस मुदतवाढ देण्याबाबत...</u>

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सार्वजनिक बांधकाम, नगररचना, पाणीपुरवठा, अतिक्रमण तथा अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आदी विभागातील कामकाजाचा वाढता व्याप व कामाची निकड लक्षात घेता कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांची आवश्यकता असल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने १० कनिष्ठ अभियंता यांची विहीत रोस्टर पद्धतीने/मागासवर्गीय अनुशेषानुसार ठोक मानधनावर नियुक्ती करणेकरीता दि. २८/०३/२०१३ रोजीची जाहीर सुचना वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. यानुसार विहीत निवड कार्यपद्धतीचा अवलंब करुन, एकुण १० कनिष्ठ अभियंता ठोक मानधन रक्कम रु. २०,०००/- प्रतीमहा ठोक मानधनावर ११ महिन्यांच्या मुदतीकरीता दि. १०/०७/२०१३ रोजी नियुक्ती दिलेली आहे. यापैकी सद्य:स्थितीत ०६ कनिष्ठ अभियंता कार्यरत आहेत. तद्नंतर कनिष्ठ अभियंतांची आवश्यकता असल्याने दि. ०८/१०/२०१३ रोजी जाहीर सुचना प्रसिद्ध करुन अर्ज मागविण्यात आलेले होते. त्यानुसार विहीत निवड कार्यपद्धतीचा अवलंब करुन ०१ कनिष्ठ अभियंता यांना दि. १६/१२/२०१४ रोजीच्या आदेशान्वये ११ महिन्यांच्या मुदतीकरीता ठोक मानधन रक्कम रु. २०,०००/- प्रतीमहा यावर नियुक्ती दिलेली आहे. सदर कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची नावे खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | नाव | नियुक्ती दिनांक |
|---|---|---|
| १. | श्री. शेळके विकास रामचंद्र | दि. १०/०७/२०१३ |
| २. | श्री. महाजन संदिप प्रकाश | दि. १०/०७/२०१३ |
| ३. | श्री. पाटील कुंदन काळुराम | दि. १०/०७/२०१३ |
| ४. | श्री. शेख इम्तियाज | दि. १०/०७/२०१३ |
| ५. | श्री. करंजकर लंकेश अर्जुन | दि. १०/०७/२०१३ |
| ६. | श्री. नलावडे अतिश दिनेश | दि. १०/०७/२०१३ |
| ७. | श्री. चौधरी तुषार मोहन | दि. १६/१२/२०१३ |

- वरील ठोक मानधनावरील कनिष्ठ अभियंता यांना मा. महासभा दि. १९/०७/२०१४, ठराव क्र. १५ नुसार पुढील ११ महिन्यांच्या कालावधीकरीता मुदतवाढ प्राप्त झालेली आहे.
- मा. महासभा दि. २३/०३/२०१५, ठराव क्र. ७५ नुसार सदरच्या ०७ कनिष्ठ अभियंता यांना महापालिका सेवेत कायम करण्यात यावे असा ठराव पारित झालेला आहे.
- तद्नंतर महापालिकेने कंत्राटी पद्धतीने कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) भरणेकरीता दि. १०/०७/२०१५ रोजीच्या जाहीर सुचनेनुसार निविदा मागवून कार्यवाही सूरु केलेली आहे.

- मा. स्थायी समिती सभा दि. २८/०८/२०१५ पुढे कार्यरत असणाऱ्या ०७ कनिष्ठ अभियंता यांच्या सेवेच्या कालावधीस दि. ११/११/२०१५ पर्यंत मुदतवाढ मिळणेची शिंफारस केलेली होती. त्याअनुषंगे सदर सभेत ठराव क्र. ५९ नुसार त्यांच्या सेवेच्या कालावधीस (दि. ११/११/२०१५ पर्यंत) अथवा त्या कालावधीच्या आधी निविदा प्रक्रिया होईपर्यंत मुदतवाढ दिली आहे.

महापालिकेतील विविध विभागातील तांत्रिक कामांचा वाढता व्याप लक्षात घेता, सुमारे ०३ वर्षांपासुन महानगरपालिकेच्या विविध विभागात कार्यरत असलेले ०७ कनिष्ठ अभियंता यांची आवश्यकता असल्याने दि. ११/११/२०१५ पासून पुढील ११ महिन्यांकरीता मुदतवाढ देणे उचीत वाटते. तसेच महापालिकेने नव्याने कंत्राटी पद्धतीने कनिष्ठ अभियंता भरण्यासाठी काढण्यात आलेली निविदा मधून वरील कार्यरत ०७ कनिष्ठ अभियंता यांच्या व्यतिरिक्त आवश्यकतेनुसार नव्याने कंत्राटी पद्धतीने कनिष्ठ अभियंता नेमणे योग्य राहील.

तरी वरील प्रमाणे प्रस्ताव मंजूरीस्तव मा. महासभेपूढे सादर करण्यात येत आहे.

(अच्युत हांगे,)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि 29/11/2014
सकाळी 11-00 वा

# मिरा-भाईदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १५५ )** :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील स्वच्छतागृह दैनंदिन देखभाल व दुरुस्ती, संचलन करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने बांधलेली १७२ सार्वजनिक स्वच्छतागृह व ०५ मोबाईल टॉयलेट आहेत. तसेच पे ॲन्ड युज तत्त्वावर बांधलेली ५६ स्वच्छतागृह आहेत. सदर १७२ सार्वजनिक स्वच्छतागृह व ०५ मोबाईल टॉयलेटची दैनदिन देखभाल, संचलन, आवश्यक दुरुस्ती कामे महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहेत. सदर स्वच्छतागृहाचे वीजबील, पाणीबील महानगरपालिका भरते. सदर स्वच्छतागृह दैनदिन देखभाल, साफसफाई १ संचलनासाठी (२४ तासासाठी) निविदा मागवून मा. स्थायी समिती सभेच्या मान्यतेने रु. २०,०००/- प्रति स्वच्छतागृह प्रति महिना या दराने खाजगी संस्थाना कामे नेमून देण्यात आली आहेत. सदर निविदाची मुदत ही जानेवारी २०१६ मध्ये संपत आहे. सदर कामांवर मोठया प्रमाणावर खर्च हो असल्याने मा. विशेष महासभा दि.२२/०७/२०१५ ठराव क्र. ३४ च्या मंजूरीन्वये सदर स्वच्छतागृह सर्व दुरुस्त्या करणे, दैनदिन देखभाल साफसफाई करणे, वीजबील, पाणी बील स्वतः संस्थेने भरणे व संचलनासाठी खाजगी संस्थाना देणे व सदर संस्थानी वापर करणाऱ्या कुटुंबाकडून मासिक दर निश्चित करुन वसूल करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या. तथापी सदर कामासाठी वारंवार निविदा मागवून देखिल निविदा भरण्यासाठी खाजगी संस्था पुढे आल्या नाहीत. सदर निविदामध्ये पाणीबील, वीजबील व मोठया दुरुस्त्या महानगरपालिकेमार्फत करण्यात येतील अशी दुरुस्ती करुन देखिल निविदाना प्रतिसाद मिळालेला नाही.

वरील परिस्थिती पाहता सदर सर्व स्वच्छतागृहांची देखभाल, दुरुस्ती, संचलन माहनगरपालिकेमार्फत करावे लागत आहे. सद्यस्थितीत अर्थसंकल्पात असलेली तरतूद संपल्याने संस्थाना पुर्नविनियोजन करुन देयके प्रदान करावी लागणार आहेत. तरी पुढील कालावधीसाठी स्वच्छतागृह देखभाल आवश्यक दुरुस्ती कामे, साफसफाई व संचलन करणेकरीता निविदा मागवून दर निश्चित करावे लागणार आहेत. तरी सदर कामासाठी निविदा मागविण्यास व खर्चास प्रशासकिय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-5/DK/2015-16 /MG 5

गोषवारा प्राप्त दि०७/०१/२०१६ वेळ ११:१५
~~मा. स्थायी समिती~~ / [illegible] गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ०७
[signature]
लिपीक
नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१८/०१/२०१६

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( १५७ )** :- महानगरपालिका क्षेत्रात होणाऱ्या पाण्याचा उपसा थांबविणे व शहरा बाहेरून येणारा माती भराव नियंत्रण ठेवणेसाठी उपाययोजना करणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र मुंबई महानगरपालिकेलगत असून राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ लगत असलेल्या काजूपाडा, चेणा, माशाचा पाडा, दासगुलपाडा, घोडबंदर भागातून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा उपसा होऊन टँकरव्दारे पाणी मुंबई हद्दीत जातो. सदर टँकर वाहतुकीमुळे सदर भागातील रस्ते वारंवार नादुरूस्त होत आहेत.

तसेच मुंबई हद्दीतून मोठ्या प्रमाणावर माती मिरा भाईंदर क्षेत्रात येत असते. त्यामुळे महानगरपालिकेस रस्त्यावर व आरक्षित जागेवर टाकण्यात येणारी माती काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो.

वरील दोन्ही विषयावर चर्चा होऊन आवश्यक उपाययोजना करणे, नियंत्रण पथके नेमणे, वाहतुक विभाग, महसूल विभाग यांच्याकडे पत्रव्यवहार करून नियंत्रण करण्याची आवश्यकता आहे. सदर प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन आवश्यक कार्यवाही व खर्चास मान्यता देण्यास शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/15-16/DK/MG-17

गोषवारा प्राप्त दि. १४/०१/२०१८ वेळ स. १०:४० वा.
~~मा. स्थायी समिती~~ / [illegible] गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ...... १५ ......
लिपिक
नगरसचिव विभाग.